# माणूस

शनिवार । ९ जून १९७३ । पन्नास पैसे



डांगे, पाटील आणि जॉर्ज

मुक्काम मुंबई । प्रभाकर म्हात्रे

संपादक
श्री. ग. माजगावकर

९ जून १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| | | |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | पंचवीस रुपये | वर्ष : तेरावे – अंक : दुसरा |
| परदेशची वर्गणी | पासष्ट रुपये | |




## सप्रेम नमस्कार

३१ मे, ७३

□ शनिवार दिनांक १२ मे १९७३ रोजीचा 'माणूसचा अंक पाहण्यात आला. प्रा. पां. शं. माईणकर यांचा 'शंभर टक्के राजकीय निर्णय' हा लेख वाचला. प्राध्यापकांनी शीर्षकाप्रमाणे मत असणाऱ्यांचे जवळ जवळ शंभर टक्के प्रतिनिधित्व केले आहे.

परंतु लेखातील वाक्प्रयोग अतिशय खटकला... राष्ट्रपती म्हणजे बोलविता धनी... असे म्हणण्यात मला त्या लेखातील विचारांच्या संदर्भात फारच मोठा विरोधाभास जाणवतो. प्रस्तुत वाक्प्रयोग मुद्राराक्षसाचा प्रताप असो हीच सदिच्छा.

**विश्वास मुंडले**, खोपोली

३१ मे, ७३

□ २६ मे १९७३ 'माणूस'मधील पृष्ठ २३ वरचे 'मुक्काम महाड' वृत्त वाचले आणि तळपायाची आग मस्तकाला गेली. वास्तविक रायगडावरचा शिव-जयंतीचा प्रचंड जनसमुदायातील भव्य सोहळा पाहून स्वर्गात देवसुद्धा लाजले असतील. मात्र आमच्यातल्याच एका 'माणूस' मधील वार्ताहराने दिलेले वृत्त वाचून दुःख झाले. जो नेत्रदीपक सोहळा झाला त्याचे वर्णन द्यावयास हवे होते, ते दिलेच नाही. फक्त शिवसैनिकांना बदनाम करण्याचाच अटोकाट प्रयत्न केला गेला. त्यातलेच एक रायगडावरील पुजारी श्री. मळेकर. हा पुजारी कट्टर जन-



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकांत व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

संघीय असून रायगडावर तो राजकारण खेळू पहात आहे. याचेविरुद्ध अनेकांनी महाड पोलीस अधिकारी आणि तालुक्याचे व जिल्ह्याचे संबंधित अधिकारी यांचेकडे तक्रारी केल्या असूनसुद्धा कुणीही याची दखल घेत नाही. कमाल आहे! दि. ४ मे रोजी रायगडावर घडलेला प्रकार असा :—

श्री. बाळासाहेब ठाकरे गड उतरून गेल्यानंतर एकही शिवसैनिक रायगडावर नव्हता. गडावरील बागेत उत्सव समितीचे रायगड परिसरातील ५।६ कार्यकर्ते बसले होते. बागेतील कारंज्यात ४।५ मुले पाण्याबरोबर खेळत होती. तेवढयात श्री. मळेकर बेभान होऊन त्या मुलांना शिव्या देऊ लागले. '××× तुमच्या बापाची बाग आहे काय?' एक मुलगा—वय वर्षे तेरा—'आमच्या बापाची नाही, तुमच्या तरी आहे काय?' पुजारी अधिकच खवळले. 'माझा बाप काढतोस' असे म्हणून त्यांनी शिवसेनेला, शिवसैनिकांना आणि शिवसेना प्रमुखांनाही शिव्या देण्यास सुरुवात केली आणि त्या मुलाला मारण्यासाठी वीट घेऊन धावले. म्हणून आम्ही मध्ये पडलो आणि पुजाऱ्यांना आवरले. त्यांना समजावून आम्ही पाठवून दिले.

रायगडावरील सुंदर बगीच्यात मुले खेळतात, महिला मोह न आवरता फुले तोडतात हे सत्य आहे. मात्र हे पुजारी स्वतःची बाग समजून प्रत्येकाला दमदाटी करीत असतात. 'माणूस'च्या वार्ताहराने शिवसैनिकांवर केलेला आरोप निंद्य आहे. शिवसैनिक हे रायगडावर नितांत प्रेम करणारे आहेत. महाराजांच्या पवित्र रायगडावर ते हैदोस घालतील, फुले कुस्करतील, आणि फुलझाडे ओरबडतील, अशी कल्पनासुद्धा कुणीही मनात आणू नये. प्रतिवर्षी रायगडावर काही जनसंघाच्या मंडळींतर्फे महाराजांचा पुण्यतिथी उत्सव साजरा होतो. मंत्री महाशय आणूनसुद्धा फार तर १०० माणसे असतात. मात्र शिवसेनेतर्फे केलेला आणि तोही श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीतला, प्रचंड जनसमुदायतला, शिव-जयंतीचा सोहळा पाहून विरोधकांचे डोळे न फाटतील तरच नवल.

**मनोहर दिघे, मुंबई**

**३१ मे, ७३**

□ अगदी खऱ्याखुऱ्या अर्थाने विधायक कार्य करून 'माणूस'ने एक तप पूर्ण केले म्हणून आनंद, थोडे समाधान, व्यक्त करण्यासाठी चारच ओळी.

ठराविक चाकोरीतील राजकारणाच्या बातम्या, मंत्री वा विरोधी - पक्षीय यांची अगदी स्टिरिओटाईप वक्तव्ये यास विटलेल्या जाणकारांना 'माणूस' 'आपला वाटतो. आज कदाचित स्पर्धेच्या वावटळीत, मटकाभविष्य नसल्याने माणूस खपाच्या फिगरमध्ये मागे असेलही, पण सामाजिक अभिरुचीचे खरेखुरे मोजमाप त्या द्वारेच होऊ शकते. ध्येयनिष्ठेचा टेंबा बाळगूनही अनुनयवादी धोरण ठेवणा-

त्यांच्या साखळीतही माणूस नाही, हे पूर्ण जाणवते. आपल्या साप्ताहिका-सारख्या दैनिकाची गरज आहे, एवढ्याच शब्दात अपेक्षाही व्यक्त करून ठेवतो. एक वर्ष फिरतीची नोकरी केली, त्यातही 'माणूस' बाबत एक आगळीच उत्कंठा व अपेक्षा आढळून आली— अगदी जळगावपासून सावंतवाडी गोव्या-पर्यंत—एवढा एक अनुभव कानावर घालून आटोपते घेतो.

आनंद एकबोटे, पुणे.

१ जून, ७३

◻ माणूसच्या २ जूनच्या अंकातील आपले मनोगत वाचले अन् एकदम जाणवले किती झर्रकन् गेला हा १२ वर्षांचा काल — माझे मलाच खरे वाटेना !

'माणूस'ची गेल्या एक तपाची वाटचाल एकाकी पण मनस्वी आहे.

सत्ता-पैसा-पक्ष कसलाही आधार नसता अखंडपणे चालू असलेली

'मनोहर' स्वरूपाचा मोह बाजूला टाकून.

मानवी मनाचे दर्शन घडवीत चाललेली.

कधी हळुवारपणे — कधी कठोरपणे — पण ठामपणे.

'माणूस' मुळेच 'नाझी भस्मा-सुरा'चे दर्शन यथार्थपणे झाले.

'लाल व्होल्गा' अन् 'चिनी ड्रॅगन' यांची ओळख झाली.

त्याचबरोबर नेताजींच्या हृदयंगम स्मृती.

सर्वांच्या हृदयांना हेलकावून गेल्या

माणूसमध्ये येणगुरच्या जनाबाईसाठी जागा आहे

सुपे, तळोदे, म्हैसाळ ही नावे येथेच आढळतात

आदिवासींच्या घामाचा सुगंध दर-वळतो येथल्याच पानापानातून

'माणूस'मध्ये प्रहार होतात निर्दय-पणे 'नखाते' सारख्यांवर

जे करावयास इतर कचरतात, दबतात.

'संस्कृति'चा तोल संभाळत

नव्या जुन्याचा 'समन्वय' साधण्याचा

'माणूस'चा हट्ट

त्याला शोभेसाच आहे

त्यासाठी चालू असलेल्या त्याच्या वाटचालीचा मागोवा घेतच

पुढील पिढीला जावे लागेल — आज ना उद्या !

तोपर्यंत 'माणूस'ची पडणारी पावले

परिस्थितीच्या धावपळीत पुसून जाऊ नयेत

म्हणून ती स्मृतीत जपणे — आवर्जून ठेवणे

एवढेच — किमान एवढे

माझ्यासारखा एक वाचक

करू शकला तरी माणूसच्या ऋणातून

अंशत: मुक्त होईल

आमची पिढी.

सुहास बाक्रे, ठाणे



मुक्काम पुणे

# अलिबाबाची गुहा

'सावकारी पाश'
या पहिल्या वास्तववादी
मराठी चित्रपटातील
एक दृश्य—
उभे असलेले
व्ही. शांताराम
←

९ जून १९७३

भारतीय चित्रपट सृष्टीला ह्या वर्षी साठ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरातील कला दालनात २ जून ते ६ जून पर्यंत चित्रपटाच्या इतिहासाचे दर्शन घडवणारे प्रदर्शन भरवण्यात जाले होते. स्टार अँड



गुहेतील आणखी एक रत्न । सैगल आणि जमुना । चित्रपट – देवदास

¤

स्टाईल स्क्रीन, संडे स्टँडर्ड इ. मधून चित्रपटांचे समालोचन करणारे श्री. फिरोझ रंगूनवाला यांच्या स्वतःच्या संग्रहाचे हे प्रदर्शन अलिबाबाच्या गुहेसारखेच होते. श्री. रंगूनवाला हे केवळ चाळीस वर्षांचे तरुण. सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी ह्या चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. आता ते उत्कृष्ट समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. चित्रपट या माध्यमाचा व्यासंग नसताना आज अनेकजण जे तथाकथित चित्रपट परीक्षण करतात त्यांची रंगूनवालांना काळजी वाटते. चित्रपट समीक्षण हे रसग्राही व सर्जनक्षम असले पाहिजे असे त्यांनी मत व्यक्त केले. ह्या प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन श्री. पी. के. नात्रर–असिस्टंट क्युरेटर–फिल्म अर्काईव्हज् ऑफ इंडिया–यांनी केले. त्याप्रसंगी अलका टॉकीजचे श्री. धारप यांचे भाषण झाले.

[ या विषयाचा एक धावता आढावा चालू अंकातील पृष्ठ ४७ वर पहावा. ]

# मुक्काम मुंबई

## प्रभाकर म्हात्रे

'२५ मेला मुंबई बंद.

'बंद'चे सम्राट जॉर्ज फर्नांडिसनी केलेली ही घोषणा. २५ मेचा दिवस जसजसा जवळ येत चालला तशी शासनाला आणि बंद विरोधकांना गोंधळून आणि भांबावून सोडू लागली.

आधुनिक मुंबईत अशी एकूण तीन व्यक्तिमत्वे आजवर झळकलीत. पहिले श्रीपाद अमृत डांगे यांचे. १९२२ साली कामत कंपनीच्या चाळीत मुंबईच्या उच्च मध्यम वर्गीय वस्तीत (कामगार वस्तीत नव्हे) डांग्यांच्या पुढाकाराने भारतात पहिल्या प्रथम कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात आली. तो महिना डिसेंबर होता. आज हिंदुस्तानच्या राजकीय जीवनात एक महत्वाचा पक्ष (त्यावेळी कम्युनिस्टात भेगा नव्हत्या) म्हणून कम्युनिस्ट पार्टी वावरते आहे. तिचा जन्म मुंबई शहरात झाला होता व तो श्रीपाद अमृत डांगे या एका ब्राह्मण सुखवस्तु तरुणाच्या पुढाकाराने झाला होता ही एक ऐतिहासिक सत्य घटना आहे.

डांग्यांनी त्यानंतर मुंबईचा ६ महिने चाललेला १९२६ चा गिरणी कामगारांचा महान संप घडवून आणला आणि मुंबईच्या दरिद्री कामगारात आणि पांढरपेशांच्या महाविद्यालयीन तरुणात स्वतःचे स्थान निर्माण केले. ४२ च्या अखेरच्या व हातघाईच्या स्वातंत्र्ययुद्धात डांग्यांच्या पक्षाने भाग घेतला नव्हता, उलट इंग्रज सरकारच्या युद्धाला मदत केली जात होती. त्यामुळे ४२ ते ५२ या दशकात मुंबईला कम्युनिस्ट पार्टी नाममात्र अस्तित्व राखून होती. तरीही १९४६ च्या प्रांतिक निवडणुकांत गिरणगावात बॅ. नूरी या कॉंग्रेसच्या कामगार मंत्र्यांचा डांग्यांनी सणसणीत पराभव केला होता. कम्युनिस्टांबद्दल त्यावेळी लोकांचा रोष असला तरी डांग्यांना लोक डोक्यावर घेत असत.

४६ नंतर मुंबईच्या तख्तावर आरूढ झालेत स. का. पाटील. ४६ ते ६७ ह्या दोन दशकाचे मुंबापुरीचे अक्षरशः ते अनभिषिक्त राजे होते. मुंबईचे लक्ष्मीधर त्यांच्या मालवणी वहाणा स्वतःच्या खिशातल्या सुगंधी रुमालांनी साफसूफ करीत, तर लालबाग, परेळचा तप्त कामगारही स. का. पाटलांकडे आपला नेता म्हणून पाहत असे. मुंबई शहराच्या राजकारणात पाटील M. P. C. C.

ला G. P. C. C. ला किंवा K. P. C. C. ला अजिबात हस्तक्षेप करू देत नसत, ते जाऊ द्या. पण मुंबई शहराच्या शासनातही खेरांचे सरकार पाटलांना विचारल्यावाचून काही करीत नसे. फार कशाला, मुंबई शहरापुरते शासकीय निर्णय पाटील ठरवीत आणि खेर त्याला शासकीय मान्यता देत असत. कॉर्पोरेशन तर पाटलांची जवळपास खाजगीच मालमत्ता होती. सतत तीन वर्षे पाटील मुंबई कॉर्पोरेशनचे मेयर होते. त्यांचे हे रेकॉर्ड अजून कोणी मोडलेले नाही. पाटील हे मुंबईचे मुख्यमंत्री सहज झाले असते पण किंग होण्यापेक्षा किंगमेकर होण्यात खरे कसब असते हे ह्या मालवण्याने हेरले होते. काँग्रेस दुभंगेपर्यंत कॉर्पोरेशनच्या शिपायापासून मेयरपर्यंत कुणी काय व्हावे हे एकटे पाटील ठरवीत, मुंबईतून मंत्रीमंडळात कुणी जावयाचे तीही आज्ञा एकट्या पाटलांकडून होत असे.

पटेलांनंतर नेहरूंना वचक वाटेल असे एकमेव व्यक्तिमत्व A. I. C. C. मध्ये चमकत होते ते म्हणजे स. का. पाटील यांचे. बलसाडच्या निवडणुकीत मुरारजी पडल्यावर मुख्यमंत्री म्हणून कै. भाऊसाहेब हिरेच होणार होते. पण हिऱ्यांना मामा बनविले खेरांनी. खेरांनी हिऱ्यांना सांगितले, मुंबई इलाख्याचा राज्यकारभार मुरारजी अभावी चालणे अशक्य आहे. तेव्हा तुम्ही मुरारजींना तार करून मुख्यमंत्रीपद स्वीकारण्याची गळ घाला. ४६ नंतर हळूहळू महाराष्ट्राच्या स्वाभिमानास गळती लागत होती आणि सोज्वळतेच्या नावाखाली नपुसकवाद जोर धरत होता. खेरांचा सल्ला हिऱ्यांनी मानून तशी मुरारजींना तार केलीही. आज यातील फक्त मुरारजी हयात असून इतर काळाच्या पडद्याआड गेले आहेत, तरी पण हा इतिहास आहे.

पण या तारेमागचे एक कुटिल राजकारण असे सांगण्यात येते, की स. का. पाटलांवर सक्त नजर ठेवणारा व वेळ पडल्यास स. कां. ना आडवा जाणारा कुणीतरी करडा प्रभावी माणूस नेहरूंना मुंबई सरकारात पाहिजे होता. आणि त्या काळात तशी फक्त एकच व्यक्ती दिसत होती. ती म्हणजे मुरारजीभाई देसाई, आणि म्हणून नेहरूंनीच खेरांच्या तोंडाने हिऱ्यांना सांगूनं मुंबईच्या मुख्यमंत्रिपदावर पडेल मुरारजींना बसविले.

आणि संयुक्त महाराष्ट्राचा लढा पेटेपर्यंत मोरारजी—पाटलांमधून विस्तवही जात नसे, हा इतिहास आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात नेहरू—मुरारजींच्या हातात सरकारे असूनही पडती घेवून स. कां. ची मदत घेणे भाग पडले. स. कां. ना कुठेतरी अडकवून ठेवल्याशिवाय भागणार नाही, न पेक्षा हा भयंकर माणूस आपणास पेचात टाकील हे हेरून ५७ साली नेहरूंनी पाटलांच्या कपाळावर अपेशी अन्नखाते फोडले आणि त्यांचा मुंबईतून पाय बाहेर खेचण्यास सुरूवात केली.

नेमका याच काळात मंगलोर बाजूचा सडपातळसा एक पोर मुंबईच्या राजकीय

पृष्ठ ५९ वर

कोपरगाव वार्ता

# कामगारांचा दुष्काळनिधीला हातभार

१९ मे १९७३ सायंकाळची वेळ – कामगार धिम्या धिम्या गतीने सोमय्या हायस्कूलच्या पटांगणावर जमत आहेत. त्यात बायका आहेत, दुष्काळी मजूर आहेत आणि जास्त भरणा आहे साखर कामगारांचा! महाराष्ट्र राज्य दुष्काळ निवारण समिती महाराष्ट्रात जे काम करते ते समजून द्यायला आले होते समितीचे अध्यक्ष – डॉ. वि. म. दांडेकर, उपाध्यक्ष कॅ. मोहिते, सेक्रेटरी डॉ. काकडे आणि नगर जिल्ह्याचे पुढारी दत्ता देशमुख. गोदावरीचे जनरल मॅनेजर कौल, मॅनेजर चौगुले आणि कोपरगाव साखर कामगार सभेचे सरचिटणीस किशोर पवार. किशोर पवार हे समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते, त्यांनीच ही सभा आयोजित केली होती. नगर जिल्हा दुष्काळी. पण त्यातल्या त्यात संघटित असा कामगार वर्ग जो आहे तो फक्त कारखान्याभोवती कोपरगाव–श्रीरामपूर भागात एकत्रित झाला आहे. त्याच कामगारांच्या वतीने दुष्काळ निवारणासाठी साहाय्य जमा करून दिले जात होते.

प्रारंभी – महाराष्ट्र दुष्काळ निवारण समितीचे सेक्रेटरी डॉ. काकडे यांनी समितीच्या कार्याचा परिचय व समिती राज्यात काय करते हे समजून दिले. समितीतर्फे १९५७ पासून दुष्काळी भागात कार्य चालू आहे. समितीतर्फे १९ जिल्ह्यात १६ निरीक्षक नेमले असून ते चाललेल्या दुष्काळी कामातील उणीवा व गैरप्रकार नजरेला आणतात. त्या समितीमार्फत सरकारला कळविल्या जातात. यामुळे प्रत्यक्ष काय काम चालले आहे हे समजते. पावसानंतर नांगरट करून देणे व पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासंबंधी आवश्यक ते संशोधन करून ते हाती घेतले जाणार आहे असे त्यांनी सांगितले.

यानंतर कॅ. मोहिते यांनी या दुष्काळामुळे या राज्यात गुरांची जी अपरिचित हानी झाली त्याचा वृत्तांत कथन केला, त्यांनी सांगितले दुष्काळामुळे महाराष्ट्रातील ४५% जनावरे खलास झाली आहेत आणि यापुढे पावसानंतर गुरांचा प्रश्न मोठा बिकट होणार आहे. अनेकांना आपले पशुधन कवडी किमतीने विकावे लागल्याने – त्यांची साधनेच नष्ट झाली आहेत. यापुढे शेतीला जनावरे घेणे, नांगरट करून शेती करणे याचे यक्ष प्रश्न निर्माण होणार आहेत व त्याच्याशी ग्रामीण भागातील शेतकरी मुकाबला कसा करणार व सरकार यावेळी काय करणार हीच कसोटी आहे. समितीतर्फे आम्ही नांगरटीची कामे हाती घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर डॉ. वि. म. दांडेकर यांनी

सांगितले, की दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती नसून ही वारंवार येणारी आपत्ती आहे. यासाठी यापुढे आम्ही 'महाराष्ट्र दुष्काळ निवारण व निर्मूलन मंडळ' अशी संघटना स्थापन करणार असून दुष्काळ निर्मूलनाचे कार्य राज्यभर वर्षभर ठेवण्याचा आमचा मनोदय आहे. या समीतिला सर्वात जास्त कामगार वर्गाने मदत केल्याचे त्यांनी सांगितले. मुंबईलाही अनेक कामगार संघटनांनी मुख्यमंत्र्यांच्या निधीला साहाय्य न करता आम्हाला साह्य केले, त्या कामगारसंघटनांनी याबाबत स्वातंत्र्य मिळवून घेतले, आमची मदत मुख्यमंत्र्यांना द्यायची की इतरांना (इतर संघटनांना) द्यायची याचा हक्क मिळवून घेतला आम्हाला आजपर्यंत कामगारांनीच जास्त मदत केली हे त्यांनी आवर्जून सांगितले.

ते पुढे म्हणाले : आमच्या समितीने सरकारला मुद्दाम कळविले आहे, की दुष्काळी कामगारांना मजुरी ही ३ किलो धान्याइतकी द्यावी. मग बाजारभाव काही असोत. त्यामुळे अर्थातच धान्य महागले तर त्या प्रमाणात त्यांनाही मजूरी द्यावी लागेल. किमान वेतन, किमान जीवन हे प्रत्येकाला मिळाले पाहिजे ही आमची मागणी आहे. आज ४० लाख दुष्काळी मजूर आहेत त्यांना किमान वेतन व ६ दिवस काम केल्यानंतर ७ व्या दिवशी सुट्टी मिळाली पाहिजे. पाऊस. पाऊस चांगला झाला तरी २०% टक्के भूमिहीन लोकांना रोजगार द्यावाच लागणार आहे. सरकारची रोजगार हमी योजना एकीकडे आहे तर दुसरीकडे बेकारी भरमसाट आहे. तसेच अनेक प्रकल्पांना चांगली माणसे मिळत नाहीत म्हणून ते पडून आहेत. याची जुळणी झाली पाहिजे.

यानंतर दत्ता देशमुख यांनी नगर जिल्ह्यांतील दुष्काळी कामांची सद्यः स्थिती सांगितली. या समितीच्या गणेशनगर, लक्ष्मीवाडी, कोपरगाव व साकरवाडी येथे ४ सभा झाल्या. प्रत्येक ठिकाणच्या कामगारांनी अकरा / अकरा हजार रुपयांचे चेक प्रत्येकठिकाणी दिले. याशिवाय शेतीमहामंडळाने दोन हजार रुपये समितीला दिले.

पुढील दुष्काळ निर्मूलनाचे काम सोयीस्कर होण्यासाठी उस व कपाशी पिकविणाऱ्या बागायतदारांकडून टनास दहा पैसे जरी दुष्काळ निवारणासाठी घेतले तरी महाराष्ट्राचे दुष्काळ निर्मूलन सुकर होईल असे श्री. चौगुले यांनी आवर्जून सांगितले.

या सभांना प्रत्येक ठिकाणी कामगार वर्गाने फार चांगली साथ दिली.

**—सौ. सुनिता श. जोशी**

# दामुतात्यांचा बंधारा

पंढरीनाथ चौधरी, विरार

वसई तालुक्याच्या ग्रामीण भागात कामण गावाजवळ चिंचोटी येथे एक नदीवर जिल्हा-परिषदेने सुमारे ८० हजार रुपये खर्च करून एक बंधारा बांधला आहे. या बंधाऱ्यास लोक दामुतात्या बंधारा असेच म्हणतात. या बंधाऱ्यामध्ये साठणारे पाणी विजेच्या पंपाच्या साहाय्याने सुमारे ३००।४०० मिटर अंतरावर पाईप टाकून नेले आहे, व या पाण्याचा उपयोग ठाणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व सध्याचे तालुका पंचायत समितीचे सदस्य श्री. दामुतात्या पाटील या एका बड्या काँग्रेस कार्यकर्त्याच्या शेतीला उपयोगी पडते. या योजनेचा फायदा एकाही गरीब व आदिवासी शेतकऱ्याला मिळत नाही. वास्तविक ही योजना आदिवासींच्या कल्याणासाठी आखण्यात आली होती रब्बी हंगामात या योजनेच्या साहाय्याने आदिवासींना दुबार पिके घेता यावी हा यामागील उद्देश. परंतु सत्तेचा उपयोग व्यक्तिगत फायदा करून घेण्यासाठी काँग्रेसमधील काही महाभाग हुशारीने करतात. दामुतात्यांनी आदिवासींच्या नावाखाली होणाऱ्या या योजनेचा फायदा स्वतःसाठी घेण्याचा प्रयत्न केला, जनतेच्या पैशामधून विकास योजनेखाली अनेक काँग्रेसवाल्यांनी आपली उखळे पांढरी करून घेतली आहेत. मग श्री. दामोदर जगु ऊर्फ दामुतात्यांसारखे त्यागी निःस्वार्थी व जेष्ठ काँग्रेस कार्यकर्ते त्याला कसे अपवाद ठरतील ! त्यांनीही जिल्हा परिषदेमध्ये आपले वजन खर्च करून आदिवासींच्या कल्याणासाठी चिंचोटी धरणाचा आग्रह धरला हे धरण झाल्यास काँग्रेसच्या कल्याणकारी राज्यात झपाट्यासरशी आदिवासींचा आर्थिक विकास घडून येईल असे दामुतात्या लोकांना समजावून देत असत. एस्. टी. बसमध्ये किंवा बाजारात दामुतात्या या योजनेची तोंड भरून प्रशंसा करीत असत. या धरण योजनेपासून आपली शेती बरीच दूर असून आपणास या योजनेचा काहीच फायदा होणार नाही असे ते लोकांना समजावून देण्याचा प्रयत्न करीत. परंतु ही योजना पूर्ण झाली म्हणजे या योजनेचे सर्वच फायदे आपणच उपभोगायचे हे त्यांनी पक्के ठरविले होते व आपला हा स्वार्थी हेतु साध्य करण्यासाठी वरून त्यागाची बतावणी करीत होते. धरण योजना पूर्ण झाल्यावर पहिल्या वर्षी अर्ध्या पाऊण एकरामध्ये एका आदिवासी शेतकऱ्याच्या नावाने रब्बी पिकाचा प्रयोग केला व त्यानंतर हे पाणी धरणापासून ३००।४०० मिटर अंतरावर असलेल्या आपल्या शेतांपर्यंत कसे नेता येईल या बाबतच्या योजना सुरू झाल्या.

१९६७ च्या जिल्हा परिषदेच्या निवडणूकीचे वेळी श्री. दा. ज. पाटील यांनी कामण मतदारसंघाची आपली जागा ठाणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. पां. शि. देशमुख यांना देऊन आपण संघटनेसाठी कोणताही त्याग करण्यास सिद्ध असल्याचें भासविले. श्री. देशमुख या मतदार संघामधून निवडून आले व जि. प. चे अध्यक्ष झाले. श्री. दामुतात्या पाटील यांनी त्याग करून जागा सोडली व त्या जागेवर देशमुखांना निवडून आणले म्हणून त्यांचे वजन कॉंग्रेसमध्ये वाढले व त्यांनी केलेल्या त्यागाचे फळ त्यांना मिळावे म्हणून आदिवासींच्या नावाने बांधण्यात आलेल्या चिंचोटी नदीवरील बंधारा व उपसा जलसिंचन योजनेचे पाईप थेट दामुतात्यांच्या शेतांपर्यंत नेऊन पोहोचवले गेले. त्यामुळे त्या बंधाऱ्याचा व योजनेचा उल्लेख सर्वत्र दामुतात्या बंधारा असाच केला जात आहे. ही झाली दामुतात्या बंधाऱ्याची कथा. आता त्याग न करता सत्तेचा उपयोग करून आपल्या नातेवाईकांचाच फायदा करून देणाऱ्या शिरवली उपसा जलसिंचन योजनेचे स्वरूप पाहू.

वसई-वज्रेश्वरी मार्गावर सुमारे १५-१६ मैलावर असलेल्या शिरवली या आदर्श गावी उपसा जलसिंचन योजना सुरू करण्यात आली आहे.

शिरवली या गावाच्या दक्षिणेकडून एक छोटी ओहोळवजा नदी वाहते. ही नदी भाजीवली ग्रामपंचायतीच्या हद्दीत आहे. भाजीवली ग्रामपंचायत हद्दीमधून जरी ही नदी वाहात असली तरी या नदीची कृपा शिरवली गावावर आहे. या नदीला एक छोटेसे धरण बांधून पाणी अडविण्यात आले आहे व त्या ठिकाणी विजेच्या पंपाच्या साहाय्याने नदीतील पाणी शेतीला वापरण्यात येत आहे. या उपसा जलसिंचन योजनेचा उपयोग शिरवलीमधील फक्त दोन बडया जमिनदारांना होतो. एक वामन भोईर व दुसरे किसन घरत. 'ज्याचे खावे शित त्याचे करावे हित' या म्हणीप्रमाणे वसई तालुका पंचायत समितीचे माजी सभापती श्री. रघुनाथ पाटील (हे वसई तालुका पंचायत समितीचे सभापती पदाची स्वप्ने पहात होते. परंतु पंचायत समितीच्या निवडणुकीत मतदारांनी त्यांना कायमची अद्दल घडावी अशी सणसणीत आपटी दिली) यांनी आपले पालनपोषण करणारे मामा श्री. वामन भोईर यांच्या फायद्यासाठी या नदीवर धरण बांधण्याचे कामी आपले वजन वापरले. त्यांना यश आले व त्या ठिकाणी उपसा जलसिंचन योजना सुरू करण्यात आली. या योजनेचे पाणी श्री. वामन भोईर व घरत या दोन बडया जमीनदारांशिवाय एकाही आदिवासी किंवा गरीब शेतकऱ्याला मिळत नाही, अशी अनेकांची तक्रार आहे.

ज्या भाजिवली गावामधून ही नदी वाहत आहे त्या गावच्या एकाही शेतकऱ्याला या नदीच्या पाण्याचा उपयोग होत नाही. या उपसा जलसिंचन योजनेखाली बसविण्यात आलेल्या दोन्ही वीज

पंपाचा उपयोग फक्त शिरवली गावासाठी होतो, भाजिवली गावचे सरपंच श्री. दत्ता पाटील भेटले असता आपल्या गावातून वाहणाऱ्या नदीचा फायदा आपल्या गावातील एकाही गरीब शेतकऱ्याला होत नाही म्हणून त्यांनी खेद व्यक्त केला. वसई तालुक्याचे प्रकल्पाधिकारी श्री. नारखेडे यांना भेटून याबाबत विचारणा केली असता आमच्याकडे कोणी मागणी केली नाही, असे ठरीव साच्याचे उत्तर त्यांनी दिले. प्रकल्पाधिकाऱ्यांनी स्वत: प्रत्यक्ष जाऊन हा प्रकल्प पाहिला असता तर त्यांना ही गोष्ट दिसून आली असती. नदीच्या एका काठावरील लोकांनाच फक्त उपसा जलसिंचन योजनेचा फायदा होतो तर दुसऱ्या काठावरील लोकांना पिके वाचविण्यासाठीही पाणी मिळत नाही. प्रकल्पाधिकाऱ्यांनी नि:पक्षपातीपणाने शासकीय योजनांचा गरीब व छोटया शेतकऱ्यांना व आदिवासींना या योजनांचा फायदा होतो किंवा नाही हे प्रथम पाहिले पाहिजे. परंतु सत्तेच्या दडपणाखाली त्यांचे काही चालत नसावे असे वाटते. शिरवलीमधील या दोन बडया लोकांच्यासाठी उपसा जलसिंचन योजना असतानाही आता इतर गरीब आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनींना फायदा होण्याच्या दृष्टीने पाझर तलावाची योजना आखण्याऐवजी या दोन बडया शेतकऱ्यांनाच उपयुक्त ठरणारा पाझर तलाव रोजगार हमी योजनेखाली नव्याने होत आहे. सत्ताधारी व त्यांच्या तालावर नाचणारी नोकरशाही असली म्हणजे मग लोकहिताचे नावाखाली बडया धनिक जमीनदाराच्या हितासाठीच योजना आखल्या जातात व खेडयातील धनधांडगेश्वर हे या योजना गरिबांऐवजी आपल्याला कशा उपयुक्त होतील या दृष्टीनेच प्रयत्न करीत असतात. वसई तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती व ग्रामीण भागातील काँग्रेसचे तरुण नेते श्री. रघुनाथ पाटील यांचे पालनपोषण त्यांचे मामा श्री. वामन भोईर यांनीच केले. मग या भाच्यांनी पाझर तलाव मामांच्या शेतीला उपयोगी पडावे या दृष्टीनेच आपले वजन वापरून तयार करून घेतला; तर त्यात चूक ती काय? आदिवासींच्या कल्याणकारी योजना आज धन दांडगेश्वर व सत्ताधारी आपल्या स्वार्थासाठी कशा वापरतात याची अनेक उदाहरणे वसई तालुक्यात सापडतील. सामुदायिक विहिरी आपल्या सोईच्या व्हाव्यात म्हणून सत्ताधाऱ्यांनी त्या आपल्या जागेत खोदल्या. भूपृष्ठ विहिरींचा फायदा गरीब शेतकरी व आदिवासी यांना होण्याऐवजी या सर्व योजनांचा फायदा धन दांडगेश्वर स्वत:साठी करून घेत आहेत. शिरवली येथील पाझर तलावाला दगड लागला तरी त्या तलावाचे काम चालू आहे, परंतु तिल्हेर येथील अनेक छोटया शेतकऱ्यांना व विशेषत: आदिवासींना उपयुक्त ठरणाऱ्या पाझर तलावाचे काम दगड लागले म्हणून २५ मे पासून बंद करण्यात आले, कारण काय तर तिल्हेर येथील मजुरांनी पुरेसे धान्य

मिळत नाही, दुष्काळी --कामावरील मजुरांना ४ रुपये मजुरी मिळावी व खावटी तगाई, बैल तगाई, बी, बियाणे मिळावे म्हणून सोशालिस्ट पार्टीतर्फे काढण्यात आलेल्या मोर्चात भाग घेतला म्हणून. पोटाला मागण्यासाठी गेलेल्या मोर्चेवाल्यांच्या पोटावर मारल्याचा काँग्रेस राजवटीचा हा खासा न्याय. या बाबत वसई तालुका पंचायत समितीचे उप अभियंता श्री. कुलकर्णी यांची मोर्चाचेच दिवशी एका शिष्ट मंडळाने भेट घेतली असता तिल्हेर येथील पाझर तलावासह वसई तालुक्यातील दुष्काळी कामे पाऊस पडेपर्यंत चालू राहतील असे स्पष्ट आश्वासन दिले होते. परतु राजकीय सत्तेच्या दडपणामुळे दुसऱ्या दिवसापासून तिल्हेर येतील काम बंद करण्यात आले कारण काय तर दगड लागला ! शिरवली येथील तलावाला दगड लागला तरी काम चालू कारण तो तलाव दोन बड्या जमीनदार व माजी उपसभापती श्री. रघुनाथ पाटील यांच्या मामाच्या विकासासाठी आहे !

महाराष्ट्र राज्याचे नामदार महसूल मंत्री व नामधारी पुरवठामंत्री श्री. वर्तक यांनी दि. २० मे रोजी पेल्हार येथे घेतलेल्या शेतकरी मेळाव्यास शेतकरी जमले नाहीत म्हणून मग दुष्काळी कामावरील मजूर अर्धा दिवस कामावरून या मेळाव्यास आणले तर चालतात. परंतु पुरेसे धान्य व मजुरी मिळावी यासाठी मोर्चा काढणाऱ्या मजुरांवर मात्र तालुका पंचायत समितीकडून अन्याय केला जावा ही अत्यंत खेदजनक गोष्ट आहे.

• • •


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे
यांचा
नवा
कथा संग्रह

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

# सो ल क ढी

## आमचा जगाला संदेश

हे ब्रिटिश लोकनेते मोठे विक्षिप्तच दिसतात. अंधारातली एखादी भानगड उजेडात आली म्हणजे आपले तडकाफडकी राजीनामा देऊन मोकळे होतात. नुकताच हीथ-मंत्रिमंडळातील लॉर्ड लॅंबटन आणि लॉर्ड जेलिको या दोन मंत्र्यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला. वार्तापत्रे म्हणतात की या मंत्र्यांचे काही गणिकांशी, जसे असावे तसे, संबंध होते. या संबंधांच्या माध्यमातून काही संरक्षणविषयक गुपिते फुटली असावीत की काय, या शंकेने सध्या ब्रिटन अस्वस्थ झाले आहे.

पण ब्रिटीश मंत्र्यांना राजीनामा द्यायला नेहमीच एवढे महत्त्वाचे कारण लागते असे कुठे आहे? काही काळापूर्वी मि. रेजिनॉल्ड मॉडलिंग यांनी राजीनामा दिला. त्यांचे म्हणे एका वास्तुविशारदांच्या कंपनीशी हितसंबंध होते. हे प्रकरण उजेडात आले तेव्हा मि. अँथनी क्रॉसलॅंड या विल्सन-मंत्रिमंडळातील माजी शिक्षणमंत्र्यांची मोठी पचाईत झाली. त्यांनी वरील कंपनीच्या चालकाकडून पाचशे पौंड किमतीचे एक दुर्मिळ कॉफीपात्र भेटवस्तू म्हणून स्वीकारले होते. हे कॉफीपात्र त्यांना परत द्यावे लागले. वरती त्यांची अब्रूनुकसानी झाली ती वेगळीच.

आमचे मंत्री बावळट असतील, लाचार असतील, उद्धट आणि बेजबाबदार असतील; पण त्यांचे चारित्र्य कसे लखलखीत आहे. रामकृष्णांच्या या देशाचा चारित्र्य हा एक अमोलिक वारसा आहे. कोणतेही राष्ट्र अन्नावर जगते, पण लोकनेत्यांच्या चारित्र्यावरच तगते, असा आमचा भोवतालच्या चारित्र्यशून्य जगाला संदेश आहे. ●

## तो सारस्वत—मी सारस्वत

मध्यंतरी मुंबईच्या शिवाजी पार्कवर अखिल विश्वातील सारस्वतांचा एक मेळावा भरला होता. या मेळाव्याला उपस्थित असलेला सारस्वतसमाज, या मेळाव्यात करण्यात आलेली विनोदी भाषणे, राष्ट्रगीताचा उचित मान राखण्यासाठी हटून बसलेले धर्मधुरिण, ज्ञातिमेळाव्याच्या कल्पनेला विरोध असणाऱ्या संकुचित वृत्तीच्या काही अपशकुनी मंडळींनी केलेली निदर्शने, असल्या किरकोळ गोष्टींसाठी हा सारस्वतमेळावा बऱ्यापैकी गाजला. पण या किरकोळ गोष्टींच्या पसाऱ्यात मुद्याची गोष्ट फारशी कोणाच्या ध्यानात आली नाही. सारस्वत ही एक कळप करून राहणारी जात आहे, कळप केल्याशिवाय

सारस्वताच्या जीवाला आत्मिक समाधान लाभत नाही, 'तो सारस्वत-मी सारस्वत' हा सारस्वतांचा महामंत्र होय, ही ती मुद्याची गोष्ट.

या महामंत्राचे साहित्यिक प्रात्यक्षिक काही दिवसापूर्वी 'माणूस'मध्येच पाहायला मिळाले होते. नुकतेच दिवंगत झालेले प्रख्यात संशोधक अनंत काकबा प्रियोळकर यांना श्रद्धांजली अर्पण करणारा लेख आमच्या रवींद्र पिंग्यांनी लिहिला होता. आता संशोधक प्रियोळकर आम्हाला ठाऊक होते; पण ते सारस्वत होते हे ठाऊक करून घेण्याची गरज आम्हाला कधीच भासलेली नव्हती. पिंग्यांनी आपल्या लेखात प्रियोळकर सारस्वत होते हे इतके आळवून आणि ठासून सांगितले आहे की 'संशोधक प्रियोळकर' यापेक्षा 'सारस्वत प्रियोळकर' हीच प्रतिमा आमच्या स्मृतीत अधिक ठळक राहील की काय अशी शंका वाटते.

प्रियोळकर सारस्वत; पिंगे सारस्वत; तो सारस्वत-मी सारस्वत. आता रवींद्र पिंगे सारस्वत आहेत हे तरी आम्हाला आधी कुठे माहीत होते ? ते त्यांनीच त्यांच्या लेखनातून पुन्हा पुन्हा सांगितले. आम्ही ते विसरण्याचा कसोशीने प्रयत्न करून पाहिला; पण पिंगे बरे आम्हाला ते विसरू देतील. 'शतपावली' करताना मधूनमधून त्यांना सारस्वत जातभाई भेटतात; आणि पिंगे पार पाघळतात. मला कोणीतरी सांगितले होते की सॉमर्सेट मॉम, चार्ल्स डिकन्स, हे मिंग्वे, विन्स्टन चर्चिल ही मंडळी मूळची सारस्वतच आहेत, असे पिंगे ठणकावून सांगत असतात.

परवा एक सारस्वत साहित्यिक मित्र घरी आले होते. गप्पांच्या ओघात त्यांनी एकदम विचारले, 'तुम्हाला ते रवींद्र पिंगे माहितीच असतील ?'

मी पटकन म्हणालो, 'हे काय विचारणे झाले ? ते लेखक रवींद्र पिंगे ना ?'

ते उत्तरले, 'लेखक रवींद्र पिंगे नाही हो, सारस्वत रवींद्र पिंगे. तो सारस्वत, मी सारस्वत'

● ● ●

---

■ मुंबई महापालिकेचे माजी महापौर रवजीभाई गणात्रा यांनी आपल्या एक वर्षाच्या कारकीर्दीत चहापानावर पन्नास हजार रुपये खर्च केला होता.

आता नव्या महापौरांनी चहापानावर एकूण पन्नास हजार रुपये खर्च केला तरी आम्हाला तो कमीच वाटेल.

■ नांदगाव तालुका दुष्काळी कामावर कारकून नेमण्यासाठी घेतलेल्या मुलाखतीत अनेक उमेदवारांनी असे उत्तर दिले की वसंतराव नाईक हे भारताचे पंतप्रधान आहेत.

महाराष्ट्र हाच भारत असे मानणाऱ्यांसाठी मुख्यमंत्री हेच पंतप्रधान होत.

■ सिगारेट झाली तरी ती दोन्ही टोकांकडून ओढता येत नाही, हे लक्षात घ्यावे; नाहीतर नाहक चटका बसतो.

# पाच दुष्मन

दहा पाच ची एक ट्रेन थोडक्यात चुकली. त्यानंतर दुसरी दहा वीसची होती. म्हणजे तब्बल १५ मिनिटानंतर दुसरी ट्रेन यावयाची होती, कारण तो सुटीचा दिवस होता. वीजटंचाईमुळे लोकलगाड्या कमी करण्यात आल्या होत्या. त्यामुळे पंधरा मिनिटे आता काय करावयाचे अशा विचारात असतानाच मी प्लॅटफॉर्मवरील एका रिकाम्या बाकड्यावर जाऊन बसलो आणि हातात असलेल्या मासिकात डोके खुपसून वाचू लागलो.

थोड्याच वेळानंतर मी मान वर केली आणि पाहिले तर एक नऊ-दहा वर्षाचा फाटके-तुटके कपडे घातलेला, सावळा तरीही देखणा चुणचुणीत मुलगा माझ्यामागे बाकड्यावरती असलेले सिनेमाचे बोर्ड वाचीत होता. अजूनपर्यंत त्याने शोर, अनुरागचे बोर्ड एक-एक अक्षर करीत वाचलेले होते. आता तो अगदी माझ्यासमोर येऊन दुसरा बोर्ड वाचताना अडखळत होता. कारण ते जोडाक्षर होते. जोडाक्षर त्याने वाचली असतील परंतु हे जोडाक्षर निराळेच होते. बहुधा अजूनपर्यंतच्या त्याच्या निरागस बुद्धीस त्याच्या मास्तरांनी त्याला हे जोडाक्षर शिकविले नसेल आणि म्हणूनच तो ते जोडाक्षर वाचताना अडखळत होता—थांबत होता.

मला त्याच्या वाचण्याच्या पद्धतीची मोठी गंमत वाटत होती. कारण त्यास ते अक्षर वाचण्यास जमत नसल्यामुळे, तो लाजत होता आणि शरमेनं हसावे तसे हसत होता. मलासुद्धा गंमत वाटली म्हणून मीही हसलो आणि त्या मुलास काय वाटले कुणास ठाऊक, तो अगदी माझ्याजवळ आला आणि त्याने मोठ्या आस्थेने मला 'दादा' हाक मारून पुढचे काय ते विचारले. आता मीसुद्धा मान फिरवून त्याच्याबरोबर वाचू लागलो आणि तो परत त्याचठिकाणी थांबला. पाच दुमन, पाच दुष्मन. परंतु तरीही आपले काहीतरी चुकतय याची त्यास जाणीव होत असावी आणि त्याने 'दादा परत वाच' असे मला सांगितले. मी लागलीच त्याला पाच दुश्मन असे प्रत्येक अक्षर वेगळे करून वाचून दाखविले. त्यावेळी कुठे तो आनंदाने हसला आणि मग स्वतः परत मोठ्याने स्पष्ट वाचू लागला पाच दुश्मन.

लागलीच तो माझ्या बाजूस येऊन बसला आणि त्याने मला एक भलताच प्रश्न केला—'पाच दुश्मन म्हणजे काय?' मीसुद्धा त्याला समजविण्याच्या स्वरात 'अरे आपल्याला फसवितात—मारतात, आपले पैसे चोरतात ते दुश्मन' अशी साधी-सोपी व्याख्या सांगितली. परंतु पुढे तो बराचवेळ काही बोलेना, अगदी शांत, मोठ्या माणसासारखा गंभीर चेहरा करून बसला. मी एकदम

घाबरलो, म्हटलं ह्याला झाले काय ? बहुतेक हाच चोर दिसतोय. म्हणून हा गप्प बसला असावा. म्हणून मी त्याला विचारले ' का रे गप्प का बसलास ?' त्यावेळी लागलीच त्याने मला आवेशपूर्ण स्वरात विचारले.—' माझ्या आयेस कामाचे पैसे दिलानी नाय ते बी दुश्मन ?' लागलीच मीसुद्धा होय असे सांगून, कुणी पैसे दिले नाहीत—कसले पैसे वगैरे विचारले असता तो हळूहळू क्रमवार मला निरनिराळी माहिती सांगू लागला—

—आमचं गाव औरंगाबाद जवळच्या खेड्यात आहे. तिकडे माझी आई दुष्काळी कामावर जात होती. माझ्या आईला रोज मोठमोठे धोंडे फोडायला लागत. आई सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते काम करीत असे. एवढ्या कामाचा रोजचा पगार १॥ रुपयाच मिळायचा. त्यामुळे आम्हाला जेवणसुद्धा पोटभर मिळायचे नाही.

हे ऐकून मला त्याची दया आली. मी त्याला आणखी निरनिराळे प्रश्न विचारू लागलो.

: तुम्ही एकूण घरात किती माणसे ?

: मी, माझी आई आणि दोन लहान बहिण भाऊ.

: आणि वडील ?

: वडील आहेत पण ते इथेच मुंबईत असतात—गिरणीमध्ये कामाला.

: मग तरीसुद्धा तुम्हाला पोटभर जेवण मिळायचे नाही ?

: दादा, कसे पुरतील ! आई रोज शिव्या द्यायची वाण्याला. म्हणायची, गरिबी हटावताय मेलीत. पह्यले म्हना—वान्यास हटव ! मग बघ कसे आम्हास खावके मिलत ते !

मी अगदी साळसूदपणे त्याच्याकडून एक एक प्रश्न विचारून माहिती काढत होतो. वाटले, माहिती खरोखरीच चांगली आहे. सत्य असेल तर निश्चित उजेड पाडता येईल. म्हणून मी पुढे विचारले—

: अरे पण वाण्याला का हटवायचे ?

: तेच तर लई लबाड. कधी काय आणायला गेले की १० पैशात मिळत नाही म्हणून सांगतो. म्हणतो, चार आणे आण, मग देतो. साधे देवाला दिवा दाखवायला तेल मागितले, तर ते बी चार आणे ? मीठ, मसाला, खोबरे सगळेच महाग. मग आम्ही नुसतेच चहा भाकर नाहीतर कांदाभाकर खातो.

: मग कालवण भात कधी खाता ?

: कधी बी नाही. दुष्काळ पडल्यापास्नं तर मुळीच नाही.

मी परत मागे जाऊन त्याला विचारले.—

: अरे पण तुझ्या आईला कुणी फसवले ?

: तो लई मोठा माणूस आहे. माझी आई काम करायची तिकडे तो पैसे वाटायचा. मध्येच एक दोनदा त्याने पैसे कमी दिले म्हणून आईने त्याला जाब विचारला म्हणून दोन चार दिवस त्याने माझ्या आईला कामच दिले नाही. मग आईने त्याची क्षमा मागितली अन् परत कामासाठी जाऊ लागली. पण परत पुढे त्याने दोन दिवसांचे पैसे कमी



**म्हणून आम्ही सर्व मुंबईला आलो**

दिले म्हणून आईने वरच्या मोठ्या साहेबाकडे तक्रार केली. तर साहेब बी तसलाच. दुसऱ्या दिवसापासून आईचे कामच बंद आले. बरोबर सहा दिवस आईला काम मिळाले नाही.

: मग तुम्ही काय केलं !

: म्हणून तर आम्ही मुंबईला आलो. बाबा आमचे मुंबईतच असतात.

: मग तुझी शाळा वगैरे ?

: बंद ! काय करणार तिसऱ्या इयत्तेच्या परीक्षेला पंधरा दिवस होते. पण खायला काहीच नाही म्हणून लागलीच मुंबईत आलो. परीक्षा सोडून द्यावी लागली.

: अरे पण मुंबईत कोण खायला देणार ?

तसा तो मुलगा हसायला लागला. प्रथम त्याच्या हसण्याचे कारण मला समजले नाही. परंतु नंतर जेव्हा तो 'आम्हास बाबांनी सांगितलाय, की मुंबईत पोटभर खावक मिळता म्हणून'! तेव्हा त्याच्या हसण्याचा अर्थ मला समजला. एखाद्या बालनाट्यातील स्वर्गात जिकडे तिकडे बासुंदीच्या नद्या, लाडूंची झाडे असतात, त्या कल्पनेप्रमाणे तो हुरळून गेलेला दिसला. परंतु मुंबईतसुद्धा मूठभर लोक सोडलेत तर बहुसंख्य लोक काय खात आहेत याची मला कल्पना असल्यामुळे मी मनाशीच हसलो.

: बाबा कुठे आहेत तुझे ?

: इथेच. चारावीच्या झोपडीत राहायला घर आहे.

: अरे पण तू इथे एकटाच कसा ?

: नाही, आईबी आहे ना ! पण ती काहीतरी खायला आणण्यासाठी गेली आहे. खूप भूक लागली आहे.

इतक्यात त्याची आई एका मुलाला कडेवर आणि दुसऱ्याला चालवत, हातात काहीतरी पुडीत बांधून घेऊन येत होती. लागलीच त्या चुणचुणीत मुलाने पुढे होऊन आईला माझी ओळख करून दिली. मग मी सुद्धा कोण, काय, वगैरे सारे सांगितले, आणि परत तिच्या मुलाने दिलेली माहिती खरी की खोटी म्हणून तिला ते सारे परत विचारून घेतले. त्यावेळी ती सारी माहिती अक्षरशः खरी असल्याचे कळून चुकले. इतरही अनेक अन्यायाच्या कहाण्या तिने सांगितल्या त्या ऐकून मनस्वी चीड आली, परंतु मी काय करू शकणार होतो ? फारतर माझ्या ऐपतीप्रमाणे मदत करू शकलो असतो, आणि त्याला ५ रु. देऊन मदत केलीही. परंतु अशी कित्येक कुटुंबे आहेत की जी कुटुंबे या पाच दुश्मनांमुळे भुकेने तडफडून जीव जगवीत आहेत ! त्यांना कोण मदत करणार ? क्षणभर विचाराने माझे मन बेचैन झाले.

आता मुंबईत कसले काम करणार, असे मी त्या माऊलीला विचारले तर धंदेवाले शेठ लोकांच्या घरची भांडी घासायची असे उत्तर मिळाले.

त्याबरोबर तो मुलगादेखील होय, मी बी आयेस आता मदत करनार. कारन भांडी घासायचे काम धोंड फोडण्यापेक्षा लई सोपे असते म्हनतात.

असे जेव्हा तो म्हणाला तेव्हा माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली कारण एक मुसमुसतं, चुणचुणीत हुशार पोर त्यामुळे शिक्षणाला अर्धवट राम राम ठोकून भांडी घासून पैसे कमविणार होता, अशा तऱ्हेच्या गोष्टी मी ऐकल्या आहेत, परंतु प्रत्यक्ष ऐकण्याची ही पहिलीच वेळ होती, त्यामुळे मन उद्विग्न झाले. हातापायाला झिणझिण्या आल्या. उगाचच हाताची मूठ आवळून जोराने बाकावर आपटली. पण नंतर लक्षात आले, एकटयाने आपटून काय होणार ? सर्वांनीच हाताची मूठ आवळली पाहिजे. इतक्यात माझी दहा वीसची ट्रेन आली आणि मी त्यांचा निरोप घेतला. आणि ट्रेनच्या दाराशीच उभा राहिलो. तेवढयात तो मुलगा धावतच आईने आणलेल्या खाऊतला लाडू मला घेऊन आला. मी त्याला हातानेच नको म्हटले आणि माझी ट्रेन दूर पळू लागली. तरी सुद्धा तो मुलगा हात अर्धवट वर करून तसाच स्तब्ध उभा होता.

पुढच्याच स्टेशनवर माटुंग्याला मी उतरलो. परत मला स्टेशनवर पाच दुश्मनचा बोर्ड दिसला. माझी विचार-चक्रे जोरात सुरू झाली.

—नित्यानंद चव्हाण

# आम्ही
## अपुरे आहोत

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई तालुका हा दुष्काळाने कमी ग्रासलेला आहे असे अधिकाऱ्यांचे मत! पण प्रत्यक्ष अंबाजोगाई शहरात आणि सभोवताली एक चक्कर मारली तर हे विधान खोटे आहे हे सिद्ध करण्याची गरज पडत नाही. १९ एप्रील रोजी अंबाजोगाई शहरात तालुका पातळीवर जो १० हजारांचा भव्य मोर्चा निघाला तोही याची सत्यता पटवून देईल. आजमितीस अंबाजोगाई शहरात निरनिराळ्या दुष्काळी कामांवर जवळपास ४ हजार मजर काम करताहेत. त्यांची गाऱ्हाणी ऐकली, त्यांच्याकडे पाहिले म्हणजे मन पिळवटून निघते....अस्वस्थ बनते.

...रविवारची एक सकाळ. १५-१६ वर्षांची काही मुले आमच्याकडे आली. त्यांच्या डोक्यावर टोपली. तर काहीच्या कडे फावडी...एक दोघांनी टोपलीत भाकरी गुंडाळलेली.... विचारणा केली, काय पाहिजे? मुले म्हणाली, 'आम्हाला बी. ॲन्ड. सी. च्या रोड-वरुन हाकलून दिलंय, रोडकारकून काम देत नाही.'

मी म्हणालो, 'चला तुम्ही साइटवर आम्ही आलोच.'

मुले आनंदी होऊन साइटवर गेली. श्री. आनंदराव चव्हाणांना घेऊन मीही त्यांच्यामागे गेलो. साइटवर काम चालू होते. पण अनेक स्त्रिया बसल्या होत्या.

: काय मावशी का बसलात?

: सायबानं कामच दिले नाय.' एक दोघींनी तक्रार केली. तेवढ्यात रोड-कारकून आला. विचारपूस झाली.

'एकच टेप असल्यामुळे मापे लवकर लवकर देता येत नाहीत' हे त्याचे उत्तर.

'दररोज असेच होतंय. आमाला १०–१० वाजेपर्यंत माप मिळत नाही.' दुसऱ्या बाईची तक्रार.

तेवढ्यात एक म्हातारा आला, 'आमाला बी काम वाढवून दिलेय. एवढे माझ्याच्याने करणे होत नाय, सायब तुमी यांना सांगा.'

अशा अनेक तक्रारी अनेक गाऱ्हाणी. एवढ्यात मुलांचे टोळके आले.

'यांना का काम दिले नाही?' आम्ही विचारणा केली.

'इनकी उमर कम है, ये काम नही कर सकते' रोड कारकूनाचे उत्तर.

आम्ही मुलांना समजावून सांगितले. आपआपल्या आईवडिलांच्या हाताखाली काम करण्याचा उपदेश दिला. बरीच मुले पांगली. एक मात्र खिन्न नजरेने उभा....

'का रे तू का उभा, जा ना तुझ्या आईला मदत करायला' मी म्हणालो.

त्याचा आवाज गहिवरला म्हणाला,



'का रे, तू का उभा?'

'मला आई नाही.'

'मग वडिलांना मदत कर' मी.

'बाप जेलमध्ये आहे. मी एकटाच आहे.' तो.

'का?' मी विचारले.

'बापाने आईला जाळून मारले म्हणून' आणि त्याने हंबरडा फोडला.

त्याला काय सांगावे हे आम्हाला सुचेना! कामावर घ्या म्हणावे तर १४ वर्षांपेक्षाही वय कमी. त्याला नाही काम मिळाले तर त्याच्यावर उपासमारीची पाळी.

एकदा रवीवार पेठच्या तळ्यावर गेलो. काही तक्रारी होत्या म्हणून! या तळ्यातील गाळ उपसण्याचे काम चालू. जवळ जवळ १२०० मजूर येथे काम करतात. प्रत्येक गँगजवळ जाऊन त्यांच्या तक्रारी आम्ही विचारीत होतो. एका गँगजवळ एक ६–७ वर्षाची मुलगी आपल्या आईचा हात धरून चालत होती. त्या मातेच्या डोक्यावर मातीची भरलेली टोपली होती. मी म्हटलं,

'आजी एवढ्या भर दुपारी या पोरीला कशाला बरोबर आणले. ऊन्हाची झळ लागेल ना तिला?'

आजी गप्प उभी होती. मुकदम आला व म्हणाला,

'या बाईला दिसत नाही म्हणून तिची ही छोटी मुलगी तिला कामावर वाट दाखवायचे काम करते. बाई विधवा आहे. घरी दुसरे कुणी नाही.'

त्याच तळ्यावर शेडस्मध्ये एक बाई येऊन बसली आहे. तिला मुकदम कामच देत नाही, अशी तक्रार एकाने केली. आम्ही शेडस्मध्ये गेलो मस्टर कारकूनाला विचारले, 'त्या बाईला काम का देत नाहीत?'

कारकून म्हणाला, 'ती गेली सात दिवस कामावरच नाही.'

प्रत्यक्ष बाईजवळ गेलो.

'बाई तुमचं नाव काय? तुम्ही सात दिवस का आला नाहीत?' मी विचारले.

'माझं बाळंतपण होऊन आज सात दिवस झाले म्हणून मी कामावर नव्हते, आज आलेय पण कारकून मला कामावर घेत नाही.' तिला काय बोलावे सुचेना.

बाजूला छोटी टोपली. त्यात छोटे मूल...त्यावर टाकलेलं फाटकं फडकं मधूनमधून हालत होते...थांबून थांबून रडून ते मूल आपलं अस्तित्व प्रगट

**कारकून मला कामावर घेत नाही**



करीत होतं. पण बाईचा चेहरा निर्विकार होता. तिच्यापुढे एकच प्रश्न होता. आज काम कसे मिळेल. आम्ही बाईचा अर्ज भरून घेतला. तिला घरी जायला सांगितले. दोन दिवसांनी तिला तहसील कार्यालयामार्फत बाळंतीण मजूर बाईसाठी मिळणारे दररोज एक रु. याप्रमाणे ३० रु. मिळवून दिले. त्यावरोबरच राष्ट्रसेवादलाच्या आरोग्य विभागाकडून काही शक्तिवर्धक औषधेही दिली व महिनाभर विश्रांती घ्यायला सांगितले.

४ दिवसांनी पाहणी करण्यासाठी म्हणून जेव्हा तळचावर गेलो तेव्हा ती बाई काम करीत असताना दिसली.

'अहो बाई तुम्ही विश्रांती का घेत नाही ? तुमचे बाळंतपण होऊन फक्त १०-१२ दिवसच झाले तुम्ही विश्रांती घ्या.' मी म्हणालो.

तेव्हा ती बाई म्हणाली, 'मला तुमची मदत नको. त्या एक रु. ने माझे भागत नाही. मला काम द्या.'

येथील समर्थ सोसायटीला दुष्काळी कामगारांना धान्य वाटपासाठी ५०० किलो धान्य दररोज मिळते आणि हे धान्य घेण्यासाठी मजुरांच्या रांगा सारख्या लागलेल्या असतात. संध्याकाळी ६ ते ८ च्या सुमारास हे दुकान उघडते आणि धान्य संपेपर्यंत दरमाणशी एक किलोप्रमाणे वाटप होते. खेडयांतून आलेल्या पण स्वस्त धान्याचे कार्ड नसलेल्या लोकांसाठी ही सोय केलेली आहे.

एकदा दुष्काळविरोधी कृतीसमितीची मिटिंग संपवून आम्हास समर्थ सोसायटीच्या दुकानापुढून जाण्याचा योग आला वेळ रात्री १०-११ ची होती. दुकानासमोर बरीच माणसं ओळीतच झोपलेली दिसली. आम्ही थांबलो. रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकडून चौकशी केली तेव्हा कळलं, की आज हे दुकान उघडलंच नाही. आता दुकान उघडेल मग उघडेल अशी वाट पाहत ही माणसे ओळीत बसली होती. दुकान तर उघडले नाहीच माणसे मात्र ओळीत बसल्या बसल्याच लवडली.

एके दिवशी सकाळी दवाखान्यात एक म्हातारा थरथरत आला.

'साहेब मला कामावरून परत धाडलंय'

'का ?' मी.

'कामावर जायला उशीर झाला. आता मी तरी काय करू तुम्हीच सांगा. रात्री ८-९ वाजता सोसायटीच्या दुकानांतून हरभरे मिळाले. सकाळी ते शिजवायला उशीर झाला.'

असं म्हणत त्याने खांद्यावरली शिदोरी काढली आणि ॲल्युमिनियमच्या ताटलीत शिजवलेले हरभरे दाखवले.

'मला कामावर घ्या मालक नाहीतर मी उपाशी मरेन. माझ्या घरात सांच्याला खायाला काय बी नाय.' त्याला पुढे बोलवेना.

परवा तर याहूनही वेगळा प्रकार पाहायला मिळाला. आम्ही तळ्यावर गेलो होतो व सकाळचे काम जरा जोरात चालू होते. एवढ्यात एका माऊलीची नि आमची दृष्टादृष्ट झाली. तिने नजर खाली टाकली अन् डोक्यावरले टोपले रिकामे करण्यासाठी मातीच्या ढिगाकडे सरसावली. टोपले पितळेचे होते. अंगावर पाचपन्नास रु. ची 'नाट' होती. बाई बऱ्या घरची होती. पण तिचा आज नाईलाज होता.

हे आणि असे कीती तरी प्रसंग. अंबाजोगाईत दुष्काळ विरोधी कृती समीती आहे. तिचे कार्यकर्ते व स्वयंसेवक दुष्काळी जनतेच्या तक्रारी अधिकाऱ्यांच्या वेशीवर टांगत आहेत. न्यायासाठी भांडत आहेत. पावलोपावली दुष्काळी जनतेला शक्य ती मदत करीत आहेत, मार्गदर्शन करीत आहेत. पण या सर्वांना एकच जाणीव होत आहे आम्ही अपूरे आहोत ! अपूरे आहोत !!

–डॉ. द्वारकादास लोहिया
आंबेजोगाई


# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत : चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# फुलांचे वेड असलेल्या ऊटीत मी, मिस रेगे, गौतम दास, संजय

इंद्रसेन डोंगरे

राहण्याच्या जागेसाठी तामीळनाडूतील ऊटकमंड येथे आणि हिमाचल प्रदेशातील कुलू-मनाली येथे आम्ही बराच पत्रव्यवहार करतो. ऊटकमंडच्या वाय. डब्ल्यू. सी. ए. कडून प्रथम उत्तर येते तुम्ही उल्लेखिलेल्या तारखांना पंधरवड्यासाठी तुमची राहण्याखाण्याची आम्ही व्यवस्था करू शकतो–माणशी रोजचा दर...अमुक अमुक–सुस्वागतम

उभयतांच्या रजेचे निकराचे प्रयत्न होतात. रेल्वेच्या स्लीपर कोचमध्ये बर्थस्च्या आरक्षणासाठी धावपळ, व्ही. टी. वरील क्यू. शेवटी अनेक खटपटीनंतर रजा, तारखा आणि रेल्वेच्या आरक्षणाच्या तारा जुळतात ! प्रवास-योजना पक्की होते–कोईमतूर–मेटुपलयम मार्गे ऊटीपर्यंत संपूर्ण रेल्वे प्रवासाचे हिल कन्सेशन घेतो आणि त्याबरोबरच अनेक बंधनेही स्वतःवर लादून घेतो ! कोईमतूरला किंवा रस्त्यात कुठेही जर्नी ब्रेक करता येणार नाही ?...तरीही हरकत नाही ! ठीक आहे. चला...

आणि आम्ही एकदाचे दोन आठवड्याच्या ऊटी येथील सुट्टीसाठी १८ मे स निघतो ! दादर-मद्रास जनतेने दुपारी २–१५ वाजता दक्षिणेकडील यात्रा सुरू होते. आमच्या कोचीन बोगीतील बहुतेक सहप्रवासी मल्याळी, तामीळ आणि तेलगू भाषिक. थेट यापैकी एखाद्या भाषेत प्रश्न विचारले जातात ! आमची हिंदी-इंग्रजीत दिलगिरी ! मग बाँबे हिंदीत किंवा इंग्रजीत थोडे संभाषण. दक्षिणेत सुट्टीत मुद्दाम चाललो आहोत हे ऐकून काहींना आदर, काहींची उपेक्षा तर काहींना हेवा–असा अनुभव...

एका रात्रीच्या प्रवासानंतर जग बरेच बदलते. उष्मा मात्र तसाच असतो. तशात शिदोरी किती काळ टिकणार ? न्याहारीला इडली, चटणी, सांबार आणि कॉफी तर दुपार-संध्याकाळ सामीष घ्या अथवा निरामीष घ्या–अक्षरशः राईसप्लेट मिळते ! दोन दिवस दोन रात्रींचा प्रवास. आम्ही चौकशी करतो. चपाती मिळेल का ?

(ज्वारीची भाकरी महाराष्ट्रातही अदृश्य झाल्यासारखी, तर म्हैसूर, आंध्र प्रांतात कुठून मिळायला ?) पण हो ना करता करता पराठा मिळेल म्हटल्याबरोबर आम्ही आगाऊ पैसे देऊन जेवणाचे कुपन घेतो! चालेल पराठा किंवा फुलका पण नुसता भात ? छे! शिक्षाच!!

दुसऱ्या रात्रीच्या पहाटेपूर्वीच कोईमतूर येते. साडे पाच, पावणे सहास मेटुपलयमला गाडी मिळते. स्टेशनवर हारेच्या हारे भरून जाई, जुई व मोगरा, चमेलीच्या वेण्या–ताज्या, सुगंधित आणि खात्री पटते. आंध्रही पार करून आम्ही तामीळनाडूच्या हद्दीत पोहोचत आहोत. मेटुपलयम सात वाजताच येते. सात–वीसला मेटुपलयम ते ऊटकमंडची मिटरगेजची निळी, लहान गाडी जाणार असते. आम्ही तिने पूर्ण पाच तासांचा अनोखा प्रवास संपवून, रस्त्यातील मैलच्या मैल पसरलेल्या सुपारीच्या बागा, निलगिरी वृक्ष, पाईन वृक्ष फणसाची झाडे, अधून मधून दिसणारा बसचा नागमोडी मार्ग, उड्या टाकून खाली धावणारे निर्झर आणि ५०००–६००० फूट उंची गाठल्यानंतर डोंगराच्या उतरणीवर सर्वत्र दिसणाऱ्या चहा-कॉफीच्या मनोरम बागा यांनी व निळ्या पर्वतावरील एकंदर सृष्टीसौंदर्यानी भारावलेल्या अवस्थेत एकदाचे ऊटकमंड स्टेशनवर उतरतो.

थोड्या फार फरकाने रेल्वे प्लॅटफॉर्मवर गाडी आल्यावर दिसणाऱ्या नेहमीच्याच धावपळी धक्काधक्कीनंतर आम्ही सामानासह स्टेशनच्या बाहेर पडतों. काही घोडागाड्या व दोन-तीन विनमिटरच्या टॅक्सीज स्वागत करतात. पण तीन चार फर्लांग घेऊन जाण्यासाठी पाच रुपये भाडे सांगतात! मी ऐटबाज गरम युनिफॉर्ममधील कृष्णवर्णीय पोलीस अधिकाऱ्यास अडचण सांगतो. तो मला मदत करण्याच्या दृष्टीने टॅक्सीवाल्याशी बोलतो. चार रुपये करून घेऊन जा म्हणून सांगून पाहातो. पण टॅक्सीवाले टस-से मस होत नाहीत! पेट्रोल मिळत नाही अन् वन वे ट्रॅफिक आहे ही सबब सांगतात. पोलिस ऑफिसरला अपमान वाटतो की आव्हान वाटते न कळे! तो आम्हास सामानासकट पोलिस व्हॅनमधून लिफ्ट देतो आणि वाय. डब्ल्यू. सी. ए. त आणून सोडतो. त्याच्या सौजन्याने आम्ही अवाक होतो! एका गजबजलेल्या थंड हवेच्या ठिकाणी हे स्वागत अनपेक्षित तसेच विचित्र होते. रस्त्यात आंध्रच्या काही भागात व तामीळनाडूच्या निलगिरी जिल्ह्यात जशी पाऊस पडून गेल्यामुळे हिरवळ दिसते, तशी अन्नपाण्याची सुबत्ता दिसते. खुद्द ऊटीला मार्केट प्लेसमध्ये मी मुद्दाम फिरतो. अन्नधान्यादि वस्तूंचे भाव विचारतो. मुंबई-पुण्यातील भावापेक्षा एका हिलस्टेशनवरील अन्नधान्याचे भाव ऐकून मला तामीळनाडूतील लोकांचा हेवा वाटतो. फक्त साखर, पेट्रोल आणि घासलेट यांचे भाव थोडे अधिक असून उत्तम गहू दोन रुपये, उत्तम तांदूळ दोड ते अडीच रुपये

आहे. तर भाजी व कांदे पंच्चाहत्तर पैसे ते रुपाया किलोहून अधिक नाही! सखल प्रदेशात रेशन तर नाहीच पण अन्नधान्याचे भाव याहून कमी आहेत. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती व एकंदर महागाईचे स्मरण होताच न कळत उमासा बाहेर पडतो!

गावात फेरफटका करीत मी स्टेशनच्या रस्त्याने चालत जातो. तो रस्त्यातील एका केशकर्तनालयाचा बोर्ड माझे लक्ष खेचून घेतो! कारण त्यावर चक्क प्रभात फिल्म कंपनीचे नाव आणि बोधचिन्ह दिसते...फरक एवढाच की Prabhat या इंग्रजीत लिहिलेल्या नावापुढे Saloon हा शब्द अधिक आहे. कमळ, उगवत्या सूर्याच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध तुतारी फुकणारी ललना वगैरे सर्व प्रभातच्या बॅनर प्रमाणेच सर्व काही आहे...

१७३४ किलोमिटर्स दूर प्रभात नावाचा व चित्राचा उपयोग एका न्हाव्याच्या दुकानावर केला जावा ही कल्पना मला रुचत नाही. मी दुकानमालकाजवळ चौकशी करतो तर कळते की परदेशी या टोपण नावाने पेंटींग करणारा व कुनूर रोडवर उटीतच राहणारा एक गृहस्थ यामागे आहे. महाराष्ट्राचे भूषण ठरलेल्या प्रभात फिल्म कंपनीच्या नावाचा व बोधचिन्हाचा गैरवापर होत आहे. हे संबंधित (श्री. राम गबाले) लक्षात घेतील तर ही फुकट फौजदारी सार्थकी लागली असे म्हणता येईल! पेंटरची ही चोरी उघडकीस आणण्याचे कार्य मी करीत आहे याचे थोडे समाधान

२५ मे पासून राजमोहन गांधी व त्यांच्या मोरल रिआर्मामेंट (एम. आर. ए.) चे सुमारे ५० देशी-परदेशी स्त्री-पुरुष कार्यकर्ते वाय्. डब्ल्यू. मध्ये पंधरावीस दिवसांच्या मुक्कामास आले आहेत. त्यांच्या तामीळ भाषिक कार्यकर्त्यांनी 'फर्गाटन फॅक्टरी' नामक तामीळ नाटकाचे प्रयोग सादर केले तर ३१ मेस सॉंग ऑफ् एशिया' नामक इंग्रजीतील संगीत-नाटिका सध्या टॉक ऑफ दि टाऊन झालेली आहे!

चेनार नामक एका ब्रिटिश फोटोग्राफरशी एम. आर. ए. विषयी माझी पहिल्यांदा चर्चा होते. आपले आजोबा व वडिल ब्रिटिश फौजेंत जनरल व तत्सम हुद्यावर असल्याचा याचा दावा असून तो मला सांगतो, 'नाही. एम. आर. ए. ही संघटना स्वतंत्र आहे. कुठल्याही एका देशाने उचलून धरलेली नाही! ती प्रामाणिकपणा, शुद्ध चारित्र्य निःस्वार्थीपणा व प्रेम (Honesty, Purity, Unselfishness and Love) या चतुःसूत्रीवर वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्न सोडवू इच्छिते.'

मिस्. रेगे, मिस्. देशपांडे वगैरे तीन-चार महाराष्ट्रीय मुलीही या घोळक्यात येथे आलेल्या आहेत. त्याही या संघटनेच्या ध्येयधोरणाविषयी झपाटल्याप्रमाणे बोलतात. मी विचारलेल्या प्रश्नांना त्यांच्या कुवतीप्रमाणे उत्तरे देतात. ती ऐकून मी विचार करतो: ही मंडळी विनावेतन काम कशी

करतात ? या समूहातील अनेकांनी स्वत:ला या संघटनेच्या– कार्यासाठी वाहून घ्यावे म्हणजे यांना तीत असे गवसले तरी काय ? यातील बहुतेक तरुण-तरुणी सुखवस्तू घराण्यातून आलेली तरी असावीत किंवा अधिक शिक्षण घेऊन बेकारीला तोंड देण्यापेक्षा, या चळवळीत पडणेच पसंत करीत असतील. की हे तरुण मनाला आकर्षित करणारे फॅड आहे ? तशी या मंडळीत मराठी, गुजराथी, हिंदी, तामीळ, बंगाली आदि विभिन्न भारतीय भाषा बोलणारी माणसे तर आहेतच; पण ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड, व्होडेशिया, पॉपुआ, न्यूगिनी, फिजी बेटे, जपान येथीलही मंडळी असून थायलंडहून आलेला एक बौद्ध महंत देखील आहे !

मी बौद्ध महंताशी एम. आर. ए. बाबत चर्चा करतो. या संघटनेच्या खास आमंत्रणावरून तो भारतात आला. सर्व धर्मीयांनी एम. आर ए. संघटनेशी हातमिळवणी करून राजकीय व सामाजिक प्रश्न सोडवावेत असा त्याचा आग्रह ! सिलोनहून परतल्यावर महाराष्ट्रातील नवबुद्धांना जागृत करण्याचे कार्य आपण करणार असे तो मला सांगतो. महाराष्ट्रातील नवबुद्धांच्या एकंदर अवस्थेबद्दल त्याला फार खंत वाटत असलेली दिसते. महात्मा बुद्धावर मराठीत कोणकोणती पुस्तके उपलब्ध आहेत म्हणून मला विचारतो आणि मी लिहून दिलेली पुस्तकांची नावे आस्थेने लिहून घेतो !

वर उल्लेख केलेल्या महाराष्ट्रीय तरुणीशिवाय मिस् चौधरी, मिस् चिनाई वगैरे आणखी तीनचार भारतीय तरुणी आणि पॉपुआ न्यूगिनीच्या दोन आणि ऑस्टेलियाची शाळकरी वाटणारी पोरगेली तरुणी या सर्व एम् आर. ए. च्या कामात निष्ठापूर्वक काम करीत आहेत गोहाट्टी (आसाम) येथे शिक्षण घेतलेला बंगाली भाषिक गौतम दास, आसामच्या दिवंगत मुख्य मंत्र्याशी नाते सांगणारा आणि इंग्लंडमध्ये मुद्रण व पत्रकार व्यवसायाचे २–२॥ वर्षे शिक्षण घेऊन आलेला संजय हजारी का 'साँग ऑफ एशिया'च्या प्रसिद्धीचे काम करतो. 'माझे वडील गुजराथी होते' असे सांगणारा फिजी बेटाचा नागरिक असलेला व आपले शिक्षण न्यूझिलंडमध्य घेऊन आलेला सुरेशचंद्र 'सांग ऑफ् एशिया' या संगीत-नारिकेचे दिग्दर्शन करतो तर एक सिंधी व दुसरा पॉपुआ न्यूगिनीचा असे दोघे तरुण इलेक्ट्रीकल इंजिनियरचे काम पाहातात. ध्येय-वेडामुळे विनावेतन काम करणाऱ्या या मंडळींचा दोन गोष्टीविषयी विशेष आग्रह आहे. एक, आमच्या 'साँग ऑफ एडिया'चा प्रयोग अवश्य पहा आणि पंचगणी (महाराष्ट्र) येथील आमच्या सेंटरला भेट द्या !

मोठमोठ्याने ट्रान्सिस्टर रेडिओ लावून सुट्टीचा आनंद घेणाऱ्याची शांति भंग करणारी उथळ, करंटी कुणी मंडळी निदान 'आनंदगिरी' वाय. डब्ल्यू. मध्ये तरी वस्तीस नाहीत हे आमचे सुदैवच ! वैद्यकीय व्यवसायाचे शिक्षण घेत असलेला फिनिश तरुण व त्याची शेलाटी, सुंदर आणि शिक्षिकेचे

काम करून नवऱ्यास मदत करणारी डॅनिश पत्नी बंगलोर येथे प्रत्यक्ष पाहिलेल्या एका भारतीय लग्न सोहळयाचे वर्णन सांगतात! त्यांना राहून राहून याचे आश्चर्य वाटते, की अंतरपाट दूर होईपर्यंत नवऱ्याने नवरीला किंवा नवरीने नवऱ्याला मुळीच कसे पाहिलेले नसते! लग्न सोहळा कोणत्या समाजातील लोकांचा होता असे मी त्यांना विचारतो. तेव्हा ते उत्तर देतात, आम्हाला सर्व 'इंडियन हे 'इंडियन'च दिसतात!' घटनेने मान्य केलेल्या सोळा-सतरा भारतीय भाषा आणि वीसएक राज्यांचे स्मरण होऊन मला त्यांचे उद्‌गार ऐकल्यावर आनंदच वाटतो.

आंतरराष्ट्रीय ख्याति प्राप्त केलेल्या 'शेक्सपियरेना' या नाटक कंपनीचे एकमेव पतीपत्नी नट-नटी द्वय आणि हिंदी-इंग्रजी सिनेनट शशीकपूरचे ब्रिटिश सासू सासरे मिस्टर मिसेस केन्डल हे आमच्या 'आनंदगिरी'तील शेजाऱ्यांपैकी एक होत! २३ मेच्या सायंकाळी त्यांच्या शेक्सपियरेना मार्फत एमरल्ड कॉलेज फॉर वुईमेनच्या सभागृहात जी. बी. शॉवरील जिरोमी किल्टी लिखित आणि गेल्या तपांत सुमारे वीस देशात अभिनित झालेल्या दोन-पात्री दोन-अंकी Dear Liar या नाटिकेचा बहारदार प्रयोग ते दोघे सादर करतात. वातावरण निर्मितीसाठी साधेच आणि मिसेस लाऊरा केन्डल यांनी स्वतःच तयार केलेले नेपथ्य या दोघांच्या अप्रतिम अभिनयामुळे सजिव होऊन उठते. शॉच्या बहुतेक नाटकात प्रमुख नटीचे काम करणाऱ्या मिसेस स्टेला कँबेल आणि खुद्द शॉ यांच्यातील सन १८९९ ते १९३९ या चाळीस वर्षांच्या दीर्घ कालखंडात झालेल्या खाजगी पत्रव्यवहारातून प्रकट होणाऱ्या प्लॅटोनिक स्वरूपाच्या प्रेमसंबंधावर आधारलेले हे नाटक केन्डल पतिपत्नीच्या भावपूर्ण आवाजामुळे आणि अभिनयामुळे प्रेक्षकांची हृदये हेलावून सोडते.

याच पतिपत्नींनी दि. २४ मेच्या सायंकाळी अण्णा स्टेडियममध्ये व उटीपासून जवळच लव्हडेल येथील लॉरेन्स हायस्कूल सभागृहात सादर केलेला Sweet Mr. Shakespeare हा कार्यक्रम चांगलाच रंगला. शाळा व कॉलेजातील शेक्स्पियरच्या विद्यार्थ्यांना या आंग्ल नाटककाराच्या सुखान्त व शोकान्त नाटकांची, त्यावेळच्या रंगभूमीची झलक हे एकमेव नटनटी द्वय भारतभर आणि इतर १५-१६ देशात गत काही वर्षात वारंवार दाखवीत फिरतात! इंग्लंडचे नागरिक असलेल्या पण युद्धोत्तर काळात स्वातंत्र्य भारतात मुंबई येथेच आपले बिऱ्हाड थाटून राहिलेल्या या ब्रिटिश कलाकार नवरा बायकोची भारताबद्दलची मते मनोरंजक वाटतात व त्यांच्या आगामी पुस्तकात कदाचित ती वाचायला मिळतील.

ऊटीतील केंद्रस्थानी असलेल्या रेसकोर्सवर दर शनिवारी रविवारी होणाऱ्या घोड्यांच्या रेसेस्, भारतात प्रसिद्ध आणि दुर्मिळ अशी बोटॅनिकल

गार्डन, पर्वतराजीत उत्तरणीवर लावलेल्या शेकडो चहा कॉफीच्या मळ्याबरोबरच येथील लोकात एक विलोभनीय सौजन्य आणि स्त्रियांत फुलांचे अनन्यसाधारण वेड दिसून येते. ऊटीतच नव्हे तर समस्त निलगिरी जिल्ह्यांत तुम्हाला सहसा सर म्हणूनच सर्वजण संबोधताना दिसतात. दुकानदार पोष्टातील कारकून, साधी वर्तमानपत्रे विकणारा पोऱ्या किंवा रेसची पुस्तके विकणारी लहान मुले असोत; ती तुम्हाला प्रत्येक वाक्याच्या शेवटी सर म्हणतील! येथील बहुतेक तामीळ नोकरवर्ग हिंदीत बोलू शकत नसला तरी इंग्रजीत तुमच्याशी संभाषण करील. तुम्ही त्याला कदाचित बटलर इंग्लीश म्हणून संबोधाल. पण अगदी अशिक्षित स्त्री-पुरुष तुम्हाला आपला आशय समजाऊन देऊ शकतो; हे काय कमी झाले?

आणखी एक मनोरंजक उदाहरण! ऊटी-कुनूर-कोटागिरी या निलगिरी पर्वतावरील परस्परापासून २५–३० मैलावर वसलेल्या थंडहवेच्या ठिकाणांतील त्रयीपैकी कोटागिरीला आम्ही सकाळच्या बसने जातो. रस्त्यातील कुणा मित्रासाठी बस-ड्रायवर बहुधा 'दिनमणि' हा तामीळ पेपर विकत घेतो. तेव्हा फ्रंट सीटवर आमच्याच शेजारी बसलेला तामीळ बांधव ड्रायवरला सर अशी हाक मारून त्याच्या जवळील तामीळ वर्तमानपत्र वाचावयास मागून घेतो! आम्ही दोघे नवराबायको ते ऐकून आश्चर्यचकित होतो!

महाराष्ट्रातील एस. टी. कितीही कार्यक्षम आणि सुव्यवस्थित चालविण्यात येत असली तरी तेथे असे ऐकायला मिळेल काय, ही चर्चा आम्ही करतो...

आणखी एक गोष्ट म्हणजे दाक्षिणात्यांचे फुलवेड!...सातच्या सुमारास आमच्या आंघोळी आटोपतात नाही तोच आमच्या व इतर पर्यटकांच्या खोलीतील व्यवस्था व स्वच्छता पाहाणारी बहुतेक अनाक्षर, काळीसावळी व शेलाटी मुलगी रोज जाई-जुई, चमेली अथवा मोगऱ्याची ताजी सुगंधित वेणी माळून येते. खोली साफ करून पुढे निघून जाते. वर अगदी नम्रपणाने इंग्रजीत तुम्हाला काय हवं-नको विचारून तुमचे मन जिकून घेते!...मार्केट प्लेसमध्ये अनेक फुलांच्या दुकानाचा तीन-चार रांगाचा विभागच वेण्यांसाठी राखून ठेवलेला आहे!

इकडे येण्यापूर्वी मुंबईत अलिकडे अधिकच बेपर्वा बनलेल्या 'नळ राजाची आतुरतेने आम्ही वाट बघायची! येथे मात्र चित्र निराळेच दिसते. चोवीसतास, वत्सल माऊलीच्या पान्ह्याप्रमाणे पाणी देण्यास आतुर असलेले नळ आम्हीच काय अन्य कुणीही क्वचितच उघडतात! हवेत गारवा इतका की साधा रुमाल धुताना थंड पाण्यामुळे हात सुन्न होऊन जातील! मुबईत सकाळ–संध्याकाळ थंड पाण्यात दोनवेळा आंघोळ करणारा मी गरम पाण्यास शरण न आलो तरच नवल!!

● ● ●

## नासिक–पिंपळगाव–बसवंत वार्ता

# ३२ महिन्यांत ३३ लाखांचा वट्टयाबोळ

रघुवीर मुळे

नासिक जिल्हा हा कांद्याचे आगर आहे. जिल्ह्यातील सटाणा, चांदवड, मालेगाव आदी सर्वच तालुक्यात कांदा उत्पादन भरपूर होत असले तरी निफाड तालुक्यात कांदा हे नगदी पीक फार मोठ्या प्रमाणात होते. आकडेवारीच्या भाषेतही हे सांगता येईल पण या लेखाचे प्रयोजन कांदा उत्पादन नसल्याने दिले नाही.

नासिकचा कांदा हा भारतभर बारमाही तर पाठविला जातोच; पण निर्यातीतही नासिक कांद्यांची आघाडी होती. गेल्या चार-दोन वर्षात सरकारी धोरणे आणि विदेशातील तणावांमुळे निर्यात एकदमच थांबली. श्रीलंका ही नासिकच्या कांद्यांची फार चांगली व मोठी बाजारपेठ होती. तीही हातची गेली. कारणे वेगळी आहेत. सरकारी पातळीवरचे 'खरे' कारण असे, की श्रीलंकेत आता कांद्याचे खूप उत्पादन होत असल्याने आपल्या कांद्याला मागणी नाही.

कांदा हे कॅश क्रॉप आहे. त्याची लागण वर्षातून दोनदा होते. एक उन्हाळ–कांदा आणि दुसरा पोळ कांदा. कांद्याचे उत्पादन एकादे वर्षी घटले तर भाव वधारतो आणि गेल्या सिझनला चांगला भाव होता म्हणून कांद्याची लागण साहजिकपणेच जास्त होती. उत्पादन खूप वाढले की भाव घसरतो. अस्थिर भावाचा हा शाप फक्त कांद्यालाच आहे असे नव्हे तर प्रत्येक शेतमालालाच आहे. शेतमालाचे भाव सरकारने बांधून दिले नाहीत. एकाधिकार खरेदी योजनेप्रमाणे ज्या गव्हाचे, ज्वारीचे, कापसाचे भाव बांधून दिलेले आहेत त्याची उत्पादन खर्चाशी देखील तोंडमिळवणी नाही, ही वस्तुस्थिती आहे. विषयाला धरून थोडेसे विषयांतर, विधानसभेच्या मागच्या अधिवेशनाच्या वेळी शेतमालाचे भाव बांधून द्यावे अशी जोरदार मागणी आमदारांनी केली होती. या प्रश्नावर बोलताना वाईचे आमदार श्री. प्रतापराव भोसले म्हणाले होते, 'या राज्याचे मुख्यमंत्री हे स्वतःच भूमिपुत्र आहेत.

पण भूमिपुत्रांच्या घामातून उत्पादिल्या जाणाऱ्या मालाचे भाव बांधलेले नसल्याने शेतकरी हा कर्जबाजारीच राहिलेला आहे. पायात घालायचे जोडेदेखील निश्चित किमतींच्या चिठ्ठ्या गळ्यात अडकवून पाच पाच हजाराच्या काचघरात एअरकंडिशण्ड दुकानात दिमाखाने उभे असतात तर मुख्यमंत्र्यांच्या (भूमिपुत्रांच्या) मळ्यातील द्राक्षे मोडक्या टोपल्यातून रस्त्यावर विकली जातात.

असो ! तर कांद्याच्या उत्पादनाला निश्चित भाव नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाची शाश्वती नाही. अर्थातच निश्चित भावाची योजना हवी हा विचार प्रबल होऊ लागला. कांद्यावर प्रक्रिया करून त्याची पावडर तयार करावी अशी योजना निघाली. उत्पादनाच्या ८० टक्के भाग खरेदी करण्याची सरकारने तयारी देखील दाखविली. नासिक जिल्हा कांदा निर्जलीकरण कारखाना सहकारी तत्वावर उभारावा असे ठरले. त्याला जवळ जवळ सात वर्षे झाली. माजी उपमंत्री व सध्याचे शामराव कदम आशीर्वादित काँग्रेसचे नेते श्री. व्यंकटराव हिरे आणि तिकिटप्रश्नी फक्त कागदावर काँग्रेसचा राजीनामा दिलेला, परंतु काँग्रेसची सर्व वैशिष्टये अंगीकृत असलेले आमदार श्री. दुलाजी सीताराम पाटील हे दोघे या कारखान्याचे सूत्रधार झाले. त्यांच्याशिवाय संचालक मंडळात वीस-वीस वर्षे सहकार क्षेत्रात चांगल्या रीतीने कार्य केलेले कार्यकर्ते होते; पण त्यांची उदासीन वृत्ती आणि या दोघांची दादागिरी या परिणामी सरकारचे, जनतेचे ३३ लाख रुपये आज पाण्यात गेले आहेत. पाण्यात गेले असे म्हटले तर या पैशांवर अन्याय होईल. कारण यातील प्रचंड रकमेच्या गैरव्यवहाराला उपरोक्त मातब्बर नेतेच जबाबदार आहेत. गैरव्यवहार परमार्थासाठी होतात


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

असे कोणीही म्हणणार नाही.

आता या एव्हढ्या प्रचंड रकमेच्या गैरव्यवहाराला सहकार खात्याने सर्वच संचालकांना जबाबदार धरले आहे. आणि तुमच्याकडून पैसे का वसूल करू नये अशी कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे. हा कारखाना १९७१ च्या डिसेंबर महिन्यात उत्पादनाला सुरुवात करील अशी घोषणा आमदार आणि कारखान्याचे चेअरमन श्री. दुलाजी सीताराम पाटील यांनी केली होती. पुढे त्यांनी दुसरी घोषणा केली — बल्गेरियातून काही स्पेअरपार्टस् याव-याचे राहिल्याने ७२ च्या दिवाळीस उत्पादनाला निश्चितपणे प्रारंभ होईल. आता ७३ चे वर्ष निम्मे संपले आहे. कशाला काही पत्ता नाही. शेतकऱ्यांचे (कारखान्याचे उत्पादक सभासद हा गोंडस शब्द) पैसे भाग भांडवलात अडकून पडले आहेत. तीव्र दुष्काळातही हा पांढरा हत्ती त्यांच्यासाठी काही करू शकला नाही. शेतकऱ्यांना पांढऱ्या कांद्याचे बी. दिले. उत्पादन काढा-वयास लावले आणि ते डुकरांना (पिंगरीमधल्या नव्हे तर उकिरड्या-वरच्या) खाण्यासाठी दिले. या निर्लज्ज पुढाऱ्यांना अद्यापिही नेते म्हणून संबो-धिले जात आहे. याचे एकमेव कारण म्हणजे जनताजनार्दन पालखी वाहून नेतो आहे आणि ढोंगी देव त्यात बसले आहेत.

या कारखान्याची यंत्रसामुग्री बल्गेरियातून आयात करावी असे ठरले. मग कारखान्याचे चेअरमन आमदार श्री. दुलाजी सीताराम पाटील, त्या-वेळचे उपमंत्री आणि कारखान्याचे सर्वेसर्वा व्यंकटराव हिरे यांची बल्गेरिया वारी ठरली. (त्यांच्या बरोबर कार-खान्याचे कार्यकारी संचालक श्री. मालोजीराव मोगल हेही गेले होते. पण ते स्वखर्चाने गेले. कारखान्याच्या खर्चाने नव्हे. मालोजीरावांचे राजकीय विरो-धकदेखील त्यांच्या सार्वजनिक चारित्र्या-बद्दल आदर बाळगून आहेत.) दुलाजी पाटलांनी कारखान्याच्या खर्चाने तर व्यंकटरावांनी बल्गेरियनच्या दुवा कंपनीच्या खर्चाने युरोपची वारी केली. (या युरोप वारीतच घडलेले ५०० डॉलर्सचे बोगस ड्राफ्टचे रामायण खा. मधू लिमये यांनी तीन वर्षांपूर्वी लोक-सभेत काढले होते. त्याचे पुढे काय असे 'अजूनही' लोक विचारतात) युरोप वारीनंतर बल्गेरियातून यंत्रसामुग्री आली **आणि तेवीस लाख रुपये किमतीची परदेशी हुंडणावळ मोजून आणलेली. या कांदा निर्ज-लीकरण कारखान्याची यंत्रसामुग्री, कारखान्याच्या पिंपळगाव बस-वंतच्या साईटवर—आग्रारोडवर गेली अडीच वर्षे उघड्यावर ऊन, वारा, पाऊस खात पडली आहे. हा सहकार की महाराष्ट्र सर-कारच्या नालायकीचे परदेशी प्रवाशांसाठी, दिल्ली आग्र्याकडे जाणाऱ्या व्ही. आय. पी. साठी, परप्रांतीयांसाठी मांडलेले खास प्रदर्शन ?**

आता या कारखान्यात कशाला काही पत्ता नाही. तेवीस लाखाची यंत्र-सामुग्री रस्त्यावर धूळ खात पडली आहे. 'फिट' झाल्याशिवाय कांद्यावर प्रक्रिया कशी होईल ? पण असे असूनही या कारखान्याने उत्पादक शेतकऱ्यांचा कांदा खरेदी केला. या खरेदी विक्री व्यवहारात ३४ हजार ४२४ रुपये आणि वरचे ४४ पैसे निव्वळ तोटा संस्थेला आला. ज्यावेळी ही खरेदी झाली त्यावेळी कांद्याचा भाव १५ रुपये क्विंटल होता पण २७ रुपये भावाने शेतकऱ्यांना पैसे देण्यात आले. दर क्विंटलला १२ रुपये अधिक देऊन चेअरमन श्री. दुलाजी पाटलांनी लोक-सेवा कशी साधली ते कळत नाही. नुकतेच लोकसेवेसाठी त्यांना निवडून दिले त्याची ही सुरुवात असावी. आता ऑडिटरने ही रक्कम संचालक मंडळा-कडून वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. चेअरमन महाशयांचे राजकारण ज्या विजय मोरे, मालोजी मोगल यांनी कर्ज काढून केले त्यांच्या माथी मारलेली ही गुरुदक्षिणा तर नव्हे ना ?

यंत्रसामुग्री येऊन पडली; पण बल्गेरिअन तंत्रज्ञांना बोलावून फिटिंग-साठी जो वेळ लागेल याचा मोबदला देण्यासाठी कारखान्याकडे दिडकी नाही म्हणून काम खोळंबले ही वस्तुस्थिती आहे. पण गरज नसताना १ लाख २५ हजार रुपये खर्च करून अतिथीगृह बांधण्यात आले. हा पैसा जर मशिन-रीच्या उभारणीसाठी वापरण्यात आला असता तर एव्हाना उत्पादनाला सुरु-वातही झाली असती. हे 'गेस्ट हाऊस'चे बांधकाम महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या (१९६१) ५५ (१) या नियमांचे उल्लंघन करून बांधण्यात आले आहे. या नियमाप्रमाणे बांधकामाच्या गुंतवणु-कीस सरकारची मान्यता घ्यावी लागते.



ती घेतलेली नाही. कांदा साठविण्यासाठी दोन चाळी साईटवर बांधण्यात आल्या ३५ हजार रुपये खर्च आला. जाणकारांचे म्हणणे असे की, त्यात १० व्यापाऱ्यांनी आपल्या चाळी बांधल्या असत्या.

## आणि आता सर्वात महत्त्वाचे !

'सल्फिट्रेटर' प्रकरणी तर फक्त शेतकऱ्यांना, कारकान्याला किंवा राज्य सहकारी बँक वा राज्य सरकारलाच फसविण्यात आले असे नव्हे तर परदेशी हुंडणावळीचे नियम उल्लंघून केंद्र सरकारलाच फसविण्यात आले आहे.

कांद्याची पावडर तयार झाल्यावर ती पांढरी दिसावी यासाठी सल्फिट्रेटर प्लँटची या कारखान्यात गरज असते. वस्तुत: येथील उत्पादन हे पांढऱ्या कांद्याचेच असल्याने तज्ज्ञांनी सल्फिट्रेटरची गरज नसल्याचे कळविले होते. चेअरमन श्री. दुलाजी पाटील हे जेव्हा बल्गेरियात गेले तेव्हा त्यांनी ७२ हजार रुपये किंमतीस हा सल्फिट्रेटर घेण्याचा कंपनीशी करार केला. तथापी कंपनीला पैसे देताना २ लक्ष ९२ हजार रुपये देण्यात आले. ठरविक किंमतीपेक्षा जास्त दिलेले २ लाख २० हजार कोणाच्या खिशात गेले ?

भाग भांडवल जेव्हा जमा करण्यात आले तेव्हा कारखान्याच्या जमाखर्चात १८ हजार ९०० रुपये जमा दाखविण्यात आले आहेत; पण हे शेअर्स कोणी घेतले याचा पत्ता लागत नाही.

इंटरनॅशनल इक्विपमेंट कॉर्पोरेशनला या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्याचे काम देण्यात आले होते. त्यांना सात हजार रुपये मोजून देण्यात आले होते. प्रत्यक्षात मात्र त्यांच्याकडून प्रॉजेक्ट रिपोर्ट आलाच नाही. आता खूप पत्रव्यवहार झाला. **चौकशी अंती कळले की ही कंपनीच अस्तित्वात नाही.** कारखाना उभारण्यास पैसा नाही. कर्मचाऱ्यांना ३-४ महिन्यांचे पगार देण्यासाठी पैसे नाहीत म्हणून कारखान्याची इमारत पिंपळगाव संघाला चारा साठविण्यासाठी भाड्याने दिली. (मशिनरी मात्र उघड्यावर) पण १९ हजार रुपये खर्च करून एम. एच. सी. ३५०१ ही कोरीकरकरीत अॅम्बेसॅडर मात्र विकत घेतली गेली. सहकाराच्या पैशावर आमदारांची मिजास.

छोटया छोटया म्हणजे १० हजारापर्यंतच्या गैर व्यवहाराच्या तर किती तरी गोष्टी देता येतील. विमानप्रवास भाडे (१५०० रु.) यंत्रसामुग्री नसलेल्या कारखान्याच्या फूड टेक्नॉलॉजिस्टचा खर्च (७ हजार) युरोपवारीसाठी उचल (५ हजार) ही उदाहरणे.

हे सर्व पाहिले म्हणजे हा कारखाना 'निर्जलीकरण' नसून 'निर्लज्जीकरण' कारखाना आहे असे वाटू लागते.

• • •

# कबुली

चंद्रकांत अंबाडे

बलात्काराला म्हणे सात वर्षांची सजा असते. पण केव्हा ? तो सिद्ध झाला तरच ? प्रतिपक्षाने सिद्ध केला तरच. समजा दुसऱ्या बाजूने तक्रारच केली नाही तर ? मग कसली आलीय सजा ? फक्त मजा ! ! पण एकवेळ ती सजा परवडली. सातवर्षांनंतर तरी मनाला शांतता जरूर लाभेल, पण...मी आज आजन्म सजा भोगतो आहे...फक्त आतल्या आत...मनातल्या मनात कुढून कुढून...झुरून झुरून... !

हाच तो बस स्टॉप ! माझी शाळा अन् मास्तरकी संपली की, मी येथे येऊन उभा राहतो...बसची वाट पहात... वाट पहाता पहाता जुन्या आठवणीत गुंगून जातो.. तेवढ्यात बस निघूनही गेलेली असते...पुन्हा विचारात बुडून जातो...तेव्हाही असाच उभा राहात असे मी...ह्याच स्टॉपवर ह्याच ठिकाणी ...मद्रासचा हा माउंट रोड जसा आहे तसाच आहे...ट्यूबलाईटस्‌चा झगझगाट वाढलाय इतकाच तो काय फरक...तेव्हा मी नुकताच ह्या शाळेत लागलो होतो. शेवटचा तास कधी संपतो असं मला व्हायचं अन् धावत पळत बसस्टॉपवर येऊन उभा राहायचो. ...अकरा क्रमांकाची बस पहात... पॅरीस ते मंडावल्ली...त्याच बसमध्ये 'ती' असायची...इव्हिनिंग बझार विभागात आजही मद्रासचे टेलिफोन एक्स्चेंज आहे...तेव्हाही होते...आठ चार ड्यूटी संपवून ती घराकडे परतायची अकरा नंबरच्या बसने...मुद्दाम कडेची खिडकी धरायची...तिचे डोळे जणू मलाच शोधत असायचे...मला पहाताच चमकायचे ते...डोळ्यांनीच मला ती बोलवायची...पुढे आमचं लग्न झाल्यानंतरही हाच क्रम.. कधीकधी तिची ड्यूटी बदलायची...माझ्या शाळेचं अन् तिच्या टेलिफोन एक्स्चेंजचं कधी कधी जमायचं नाही.. मग जो आधी सुटेल त्याने दुसऱ्याची वाट पाहायची आधी बसस्टॉपवर आणि नंतर घरी...कधी कधी दोघांची चुकामूक व्हायची...आवडत्या व्यक्तिची वाट पहाताना वेळ सरता सरत नसतो म्हणे ! त्या संध्याकाळी तसंच झालं... धो धो पाऊस सकाळपास्नंच कोसळत होता...मद्रासचा पाऊस एकदा लागला की, लागला...बसस्टॉपवरतीच मी चिप्प भिजलो...बसेसही त्या पावसाने जणू गारठल्या होत्या...चरफडतच घरी आलो...वाटलं, ती आलेली असेल आधीच...गरम गरम कॉफीचा कप मिळेल ह्या भिजलेल्या जीवाला... वळणावरून वळताच आमच्या घराची खिडकी दिसते...मोठ्या आशेनं पाह्यलं पण खिडकीत अंधारच होता...वाटलं

तूही दिवा लावायचा कंटाळा केला असावास...पण तेव्हा घराला लटकणारं थंडगार कुलूप उघडून मी आत आलो तेव्हा माझ्या पायातलं जणू त्राणच संपलं! तशाच भिजलेल्या कपड्यांशीच मी कॉटवर स्वतःला झोकून दिलं...पोटात भूक...समोर चहा-साखरेचे डबे...बाहेर गारवा... कपडे भिजलेले...आणि अंगामध्ये तर मुळीच शक्ती नाही...बुटाचे बंद सोडून पाय मोकळे करण्याचीसुद्धा. झोपही येईना...तेवढ्यात बाहेर पाऊस पडू लागला...खुंटीवर छत्री होती तशीच ...म्हणजे तू छत्रीही नेलेली नव्हतीस तर...चरफडण्यात ह्या एका कारणाची भर पडली...आज तिने फोनदेखील केलेला नव्हता मला...बसस्टॉपवर वेळ किती वाया गेला होता माझा...भूक लागली होती खूप...आणि नंतरच पुढची ती अप्रिय घटना घडली...जिला मी पाप समजतो...तुम्ही कदाचित समजणार नाही...फार मोठे पाप... ज्याला प्रायश्चित काय ते समजेना...

पुण्य कुठे संपते आणि पाप कुठें सुरू होते कधी समजत नसते म्हणे. प्रत्येकजण स्वतःला सोईस्कर मर्यादा ठरवून घेत असतो...पुष्कळ उशीराने ती आली...ती कधी आली ते मला समजलंही नाही. स्वयंपाक घरात काहीतरी खुडबूड वाजल्याने मी दचकून जागा झालो. पाहतो तर ती तांदूळ निवडून भात टाकण्याच्या तयारीत होती... माझी साधी चौकशीदेखील करण्याची आवश्यकता वाटली नव्हती तिला...

माझा रागाचा पारा एकदम चढला... तावातावाने उठून तिला रागावण्यास सुरुवात केली...सुरुवात, छत्री का नेली नाहीस म्हणून...मध्य, उशीर का केलास? फोन का नाही केलास म्हणून ...आणि शेवट?...शेवट आठवत नाही नेमका...पण शब्दांनी शब्द वाढला... तुझी केरळीय इनचार्ज थेरडी हरामी आहे ते काय मला ठाऊक नव्हते? पण रोज तेच ते, तेच ते ऐकून मी आधीच वैतागलो होतो...अन् एवढ्यात ती म्हणाली—

'वैताग आलाय असल्या जिण्याचा! तळमजल्यावरच्या बॅटरीस्टोरमधे ॲसीडच्या बरण्या भरल्यात! पिवूनच टाकते उद्या. सुटशील तू माझ्या त्रासातून कायमचा...'

'काय म्हणालीस! म्हणजे आत्महत्या?'

'हो, आत्महत्याच...सूसैड...पण तुला गुंतवणार नाही...चिठ्ठी लिहून ठेवीन स्वखुषीने म्हणून...झालं समाधान?'

—तिरिमिरीसरशी मी पुढे झालो अन् एक श्रीमुखात ठेवून दिली तिच्या... खाड्दिशी...लग्नानंतर प्रथमच... क्षणात तिच्या गोऱ्या गोऱ्या गालावर बोटे उमटली...मी किंचाळलो... 'बोलशील पुन्हा तसलं? की, देवू आणखीन एक?'...मी हात वर उगारलादेखील...घाबरून दूर सरण्याऐवजी, तिने एकदम मलाच मिठी घातली...कितीतरी वेळ स्फुंदत राहिली ...दोन्ही हातात माझा चेहरा धरून

ती माझ्याकडे डोकं वर करून पाहायची...बोलण्याकरता ओठ तिचे थरथरत होते, पण शब्द फुटत नव्हता... पुन्हा माझ्या छातीवर डोकं घुसळीत स्फुंदायची...लहान मुलाप्रमाणे...आईने जरी मारलं तरी ते पुन्हा आईच्याच कुशीत शिरतं तसं...बऱ्याच वेळानं ती एकदम अस्पष्टसं काहीतरी घशातल्या घशात विचारू लागली...

'तू खरंच मारलंस मला ?'

'......'–मी गप्पच–तिची नजर चुकवीत.

'माझा नाही विश्वास बसत, तू कधीच असं करणार नाहीस.'

'—' मी गप्पच.

'शक्यच नाही तसं...भास झाला मला.'

'नी'–मी बोलण्याचा प्रयत्न केला–रोहिणी–चद्रकांताची रोहिणी आणि


## शनवारवाड्यातील शमादान

## ब. मो. पुरंदरे

## किंमत : साडेतीन रुपये

## राजहंस प्रकाशन


त्याचं माझं हाकमारं लाडिक रूप 'नी' –पण तिनं बोलूच दिलं नाही मला... एकदम दूर सरकत ती म्हणाली... अगदी नेहमीच्या आवाजात...जणू काही झालंच नाही अशा सुरात–

'चल तुला जेवायला वाढते, भूक लागलीसेल ना गं !'

हसावं की रडावं की, नेमकं काय – मला कळेना. माझं डोकं सुन्न झालं होतं...बधीर झालं होतं...साऱ्या संवेदना संपल्या होत्या...आपण काय केलं ह्याची जाणीव नव्हती...मी काय जेवलो किंवा जेवलो की नाही ? कपडे बदलून तिने मला कसं झोपवून दिलं...काहीही आठवत नाही आता ... अन् तेव्हाही समजलं नाही...त्याच अवस्थेमध्ये मी साडेसात वर्षे सजा असणाऱ्या पापाचीही भर घातली...ती नकोनको म्हणत असताना...तिची साथ नसताना ... मनापासून मनाविरुद्ध...

पहाटे पहाटे मी अचानक जागा झालो...शेजारी ती नव्हती...एकदम मनात चरकलं...विजेचा शॉक बसावा तसा मी उठलो...नकळतच मनगट समोर आडवं धरलं...साडेचार झाले होते...सैपाकघरांत मंदसा प्रकाश दिसला...पण दारातच थबकलो... देव्हाऱ्यातील निरांजने मंदपणे तेवत होती...घरभर उदबत्त्यांचा सुवास पसरलेला होता...सगळ्या देवांवर फुले बसली होती...गंधाची सहाण अद्याप ओलीच होती...तिच्या समोर ज्ञानेश्वरी होती...नाहीतरी बीएला मराठीतच ज्ञानेश्वरी घेवूनच तिने ऑनर्स मिळवि-

लेला होता...बराच वेळ मी उभा होतो...एवढयात तिने एकदाही पान उलटले नाही म्हणून हळूच तिच्या समोर झालो.. डोळे मिटलेले... ध्यानस्थ की झोपलेली कोणजाणे ... दोन्ही गालांवरचे ओघळ मात्र सुकलेले दिसत होते...त्या निरव्ध शांततेत माझ्याच श्वासाचा मलाच डिस्टर्ब होवू लागला...क्षणभर मोह झाला...तिला घट्ट हृदयाशी धरावं...पण मन आवरले...तिचे स्नान आटोपलेले होते... माझ्यासारखी ती अपवित्र नव्हती... नकळतच मी सैपाक घरातल्या त्या थंडगार - फरशीवर झोपून घेतलं ... साष्टांग नमस्कार जणू...पण तिच्या पायाजवळ मस्तक कसं आलं कोण जाणे...माझ्या डोळयांनी मला धोका दिला होता...गेल्या १५/२० वर्षांत मला अश्रू ठाऊक नव्हते पण आज बेटे कुठून आले कोण जाणे...अचानक माझ्या केसांमधून नाजुक बोटे फिरू लागली. ...सोन्याची पाटली कांचेच्या बांगडीवर किणकिणली तेवढाच काय तो आवाज झाला...इतक्यात माझ्या कानाच्या पाळीवर एक थेंब पडला...पाठोपाठ दुसरा...मग तिसरा...एखाद्या लघुकथेंत शोभावा असा हा प्रसंग ... झालेल्या पापाची कबूली मिळाली होती . शब्दांविना...अन् पाप धुतले जात होते...निष्पाप अश्रूंच्या अमोल धारेने...

● ●

---

■ सौ. तारकेश्वरी सिन्हा म्हणतात : भारतातील लोकशाही टिकविण्यासाठी खऱ्या बळकट विरोधी पक्षाची गरज आहे.

आम्हाला तर असे वाटते की भारतातील लोकशाही टिकवण्यासाठी खऱ्या बळकट सत्ताधारी पक्षाचीच गरज आहे.

■ एक टीकाकार म्हणतात : कवीने कोणत्या विषयावर कविता लिहावी हे बंधन कवीवर असू नये.

आम्ही म्हणतो कवीने कविता लिहावी हेही बंधन कवीवर असू नये.

■ मुंबईच्या सरकारी दूध योजनेत दूधपत्रिकाधारकांना आता बाटल्यांऐवजी प्लॅस्टिकच्या पिशव्यातून दूध वाटले जाऊ लागले आहे असे म्हणतात, या योजनेचे अनेक फायदे आहेत : दूध अधिक काळ टिकते. भेसळ करता येत नाही. बाटल्या फुटल्यामुळे होणारे नुकसान टळते. बाटल्या धुण्याचा खर्च, पाणी, वीज व साबण वा धुलाईची पावडर वाचते.

शिवाय असेही म्हणतात की यामुळे दुधातील स्निग्धांशात वाढ होते !

लंडनहून श्रीनाथचं पत्र आलं होतं — चौदा वर्षातलं हे दुसरं पत्र !

मागे रेणूची शंभर पत्रं गेली तेव्हा एकदाचं त्याचं पहिलं पत्र आलं होतं—

"पुन्हा पुन्हा पत्रं पाठवून हैराण करू नकोस. आज मी तुला एकदाचं सांगून टाकतोय की मी इथंच स्थायिक होण्याचा विचार करतोय. तुम्ही कुणी इथं येण्याच्या फंदात पडू नका. मी क्लारा नावाच्या मुलीशी लग्न केलंय — मला दोन मुलंही झालीयत — हो, आणि जर यदाकदाचित, भारतात क्लाराला, आणि मुलांना घेऊन आलोच तर अंधेरीचं आपलं घर आम्हाला राहायला लागेल. त्यासाठी तू दुसऱ्या, घराच्या शोधात राहा — ते घर माझं आहे — मी तिथं येताच ताबडतोब माझ्या स्वाधीन व्हायला हवंय—"

बी. ए. च्या परीक्षेच्या वेळी फायनल लेसनची रेणू तयारी करीत होती. "असं असेल माझं घर" हा निबंध मुलांकडून ती अभिनव पद्धतीने लिहून घेणार होती. सुरुवातीच्या प्रास्ताविकात स्वत:चे अनुभव समरस होऊन सांगणार होती. त्याचीच ती तयारी करीत होती आणि श्रीनाथचं हे पत्र अचानक, ध्यानी मनी नसता हाती आलं. मग तिचा सगळा उल्लासच मावळला, लेसन नोटची जुळणी रद्द करून पलंगावर ती मुळूमुळू रडतच बसली.

माझं घर ! म्हणे माझं एकट्याचं घर ! कधी श्रीनाथने एकट्याने हे घर बांधलं ? माझा हातभार लागला नव्हता या घराला ! माझ्या सहकार्याशिवायच हे घर उभं राहिलं !

किती नोकऱ्या धरल्या ! मुलांची किती आबाळ केली या स्वत:च्या छोट्याशा घराच्या ध्यासापायी ? किती काटकसर केली ? किती हौसा-मौजा मनातल्या मनात जिरवून टाकल्या ? किती श्रम घेतले ! किती हालअपेष्टा सहन केल्या ? आणि हा म्हणतो हे माझंच घर...केवळ आपलं त्याच्या नावावर आहे म्हणून ? आणि कुणासाठी ही एवढी मग्रूरी ? गोऱ्या कातडीच्या एका परदेशी बाईसाठी ! तिच्या पोटी जन्माला आलेल्या मुलांसाठी ! आणि त्यांच्यासाठी माझ्या मुलांच्या तोंडचा घास काढून घ्यायचा याने ! माझ्या हक्काचा निवारा हिसकावून घ्यायचा ! इतक्या उलट्या काळजाचा हा माणूस ? आणि याच्यावर विश्वास ठेवून आपण मनोभावे याचा संसार केला ! याच्यावर जीव जडवला ! याच्या आधारावर इतकी वर्षं उमेदीने घालविली ! तो इथं नसताना एकटीच्या जीवावर घर-दार, सारा संसार, सासू-सासरे सारंसारं संभाळलं. आणि हा आपला खुशाल तिथे परक्या देशात, कुणा परक्या बाई-बरोबर नवा संसार मांडून बसला. आणि वर ही मुजोरी...अपमानाने रेणूचं सारं अंग, मस्तक नुसतं झिण-झिणल्यासारखं झालं होतं, त्या दिवशी कॉलेजला तिने दांडीच मारली. महत्वाचे पिरीयडस् होते तरीसुद्धा तिला जाव-वलंच नाही.

संध्याकाळी सासरे कामावरून आले तेव्हा तिने ते पत्र त्यांच्या हातात दिलं

# नातं

सौ. वसुधा पाटील

होतं. त्यांनी ते वाचलं त्यावेळी गळा भरून येऊन ते म्हणाले होते, "पोरगा नादान, लफंगा निघाला यापेक्षा जन्माला आला नसता तरी चाललं असतं."

रात्री मुलांशिवाय कुणीच जेवलं नव्हतं. सासू तीन-चार दिवसांनी बाहेरून कुठून तरी आली होती. तिला जेव्हा मुलाची कर्तबगारी कळली तेव्हा तिने त्र्यागाने आकाशपाताळ एक केलं होतं. देवापुढे धरणं धरून एकसारखी ती रडत, ओरडत राहिली होती.

"विरुपाक्षा, या पोरीने काय एवढा मोठा गुन्हा केला होता म्हणून तू ही शिक्षा तिला कठोरपणाने दिलीस? तिच्याकडे रूप आहे, दृष्ट लागण्याजोगे गुण आहेत, बुद्धी आहे, पुरुषांसारखी कर्तबगारी आहे, का तिच्या नशीबात असा कपाळ करंटा नवरा घातलास? तरी तो परदेशी जायला निघाला तेव्हा मी हिला कळवळून कळवळून सांगत होते, "बाई गं, तू आपली त्याच्याबरोबर जा. परदेशी पुरुषाने एकटं राहणं बरं नव्हे. आमची आणि मुलांची बिलकूल काळजी करू नकोस." तर ही आमच्यासाठी इथंच राहिली. मुलं लहान, आम्ही म्हातारी, कुणाच्या जिवावर टाकायची म्हणून इथच राहिली आणि आपला नवरा मात्र हरवून बसली. काय हे म्हातारपणी दुःख भोगायला आमच्या नशीबात?"

अखेर दोघांनी मिळून तिला निक्षून सांगितलं, "त्याच्यावर आपण कोर्टात खटला भरूया! एक बायको जिवंत असता तिथं दुसरं लग्न करतो म्हणजे काय घटस्फोट घेतल्याशिवाय! बेकायदेशीर व्यवहार आहे सारा तू अर्ज कर. आपण पैशांची काही तजवीज करू."

त्यावेळी रेणू शांत झालेली होती—सगळा मनस्ताप आतल्या आत जिरवून ती शांतपणे म्हणाली होती, "मुलांचा विचार करायला हवा—त्यांना वडील असतांना ते नाहीत असं होता कामा नये—आणि एवढं झगडून झगडून, जुलूम जबरदस्तीने लादलेल्या संसारात काही गोडीही नाही—त्यांना यायचं असेल तेव्हा येऊ देत... घर त्यांच्या नावावर आहे-मी आपलं ते त्यांच्या स्वाधीन करीन—आणि तशी जर वेळ आलीच तर मी मुलांना घेऊन कुठेही स्वतंत्र रीतीने राहीन—तेवढी धमक माझ्या अंगात आहे—"

मग सासऱ्यांनी वकीलाच्या घरी खेटे घालून घालून बंगलोरची थोडीशी वडिलोपार्जित जमीन शेतीवाडी आणि जुनं घर नातवाच्या नावावर करून ठेवलं-आणि आपल्या फंडाच्या रकमेवर रेणूचा हक्क शाबीत करून ठेवला-त्यांना निश्चित खात्री होती की आपल्या पश्चात् आपल्या बायकोची रेणूच व्यवस्थित काळजी घेईल-कारण श्रीनाथचा काही आता भरवसा नव्हता.

श्रीनाथ इंग्लंडला गेला होता त्यानंतर त्याची आई दोनदा जिवावरच्या दुखण्यातून नशीबानेच बचावली होती-परंतु त्याचे सारे श्रेय रेणूलाच द्यायला हवे होते-मुलं लहान, त्यांचा अभ्यास, सासूची सेवासुश्रूषा, स्वयंपाकपाणी हे सारं करून अविश्रांत मेहनतीने तिने एम. ए. ची पदवी मिळवली होती-अपयश एवढंच की या साऱ्या व्यापात तिचा क्लास गेला होता-


सासऱ्याने त्यावेळची तिची तडफड पाहिली होती-आणि भारावून जाऊन कौतुकाने त्याने श्रीनाथला त्याबद्दल पत्रही पाठविलं होतं-पण त्याने त्याचं बोटभरही उत्तर पाठवलं नव्हतं-शेवटी त्यानेही लेकाचा नाद सोडला होता.

नाद सोडला नव्हता एकटचा रेणूने-ती दर महिन्याला पत्र, मुलाचे फोटो पाठवतच राहिली होती-पत्रातून इथली सारी हकीगत कळवीतच राहिली होती-तिथल्या त्याच्या संसाराची चौकशी करीतच राहिली होती-एका ओळीच्याही उत्तराची अपेक्षा न ठेवता-

गेल्याच महिन्यात तिने कळवलं होतं, "तुम्ही गेलात तेव्हा वनिता पाच वर्षांची एवढीशी चिमुरडी पोर होती-तिचा प्रेम विवाह ठरलेला आहे-आता मुलगा चांगला डबल ग्रॅज्युएट आहे-दिसायलाही स्मार्ट आहे-नोकरी घरदार सगळंसगळं चांगलं आहे-माणसंही घरची फारच उत्तम आहेत-खर्चाचा काहीही बोजा लादणार नाहीत आपल्यावर! एकोणीस मार्चचा मुहूर्त ठरविला आहे-घरच्याघरी साधासा धार्मिक लग्न समारंभ होणार आहे-मुलगी तुमचीही आहे-कळवायला तर हवं-म्हणून कळवितेय-त्यादिवशी जरा इथली आठवण करा-पोरीला मनापासून आशीर्वाद द्या दोघांचेही फोटो पाठवीत आहे-"

हे पत्र ललिताने कधी नाही ते सहजच वाचलं-त्याबरोबर रागाचा पारा वर चढून तिने ते फाडायलाच घेतलं-संतापाने जळफळून ती आईला म्हणाली. "तुला हे नसते व्याप करायला कुणी सांगितलेत? त्या माणसाशी आपला संबंध काय? ज्याचा चेहेरासुद्धा मला आठवत नाहीय त्या बापाचे आशीर्वाद, फाशीर्वाद घ्यायची मला मुळीच जरूर नाहीय-तू त्याला पत्रं आधी पाठवतेसच कशाला? नालायक माणूस-! मी नाही त्याला आमचे फोटो पाठवू द्यायची-"

रेणूने तिची समजूत काढण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु तिने आपला हेका सोडला नाही-पत्र तर फाडून टाकलंच पण फोटोही उचलून घेऊन तरातरा निघून गेली-मग मुलं घरात नसताना रेणूने परत नुसतं पत्रच लिहून पाठवलं-



सोबत लग्नाची आमंत्रणपत्रिका—त्याचच उत्तर आलं ! खास श्रीनाथच्या हस्ताक्षरात ! तेरा वर्षांनी ! इतक्या आसुसलेपणाने रेणू इतकी वर्षे ज्याची वाट पाहत होती ते ! त्यान लिहिलं होतं,

"मी भारतात येत आहे—मुलांना

बघावसं वाटतंय! ललिताचं कन्यादान करायची इच्छा आहे-लग्न वैदिक पद्धतीनेच झालं पाहिजे-देवक आपण दोघांनी ठेवायचंय-माझी फक्त दहा दिवसांची रजा आहे-त्यामुळे फक्त लग्नाच्या दिवशी मी घरी राहीन-बाकीचे दिवस हॉटेलात राहणार आहे-बरीच कामंही उरकायची आहेत-अम्मा आणि बाप्पा तिथे भेटतीलच! अच्छा-"

पत्र वाचताच रेणूचं हृदय भरून आलं-तिला खूप आनंदही झाला-आणि खूप दुःखही झाले-एखाद्या परक्या माणसासारखा हा माणूस मुलीच्या लग्नाला फक्त एक दिवसा पुरता घरी येणार आणि बाकीचे दिवस हॉटेलमध्ये राहणार! जसे काही आम्ही याचे कुण्णी कुण्णी नव्हेतच-बायको, मुलं, आईवडील यांचे त्याच्याशी कसले संबंधच नाहीत-रक्ताचे, नात्याचे, स्नेहाचे कसले कसलेच पाश नाहीत-आम्ही जणू दुसऱ्या ग्रहावरची माणसं! परंतु पाश नाहीत असं तरी कसं म्हणायचं? मुलांना, आईवडिलांना भेटावसं वाटलं, मुलीचं देवक ठेवावसं, कन्यादान करावसं वाटलं, इतक्या वर्षांनी का होईना पण घराची आठवण झाली हे काय थोडं झालं? खूप झालं-आपल्या दृष्टीने हेच खूप झाले...

आनंदाने मोहरून तिने पत्र सासऱ्याला दाखवलं-सासूला स्वतःच वाचून दाखवलं-दोघांनीही नुसते सुस्कारे सोडले.

"तुम्हाला मुलगा घरी येणार याचे काही काही वाटत नाही?" तिने निराश होऊन विचारलं—

"एक दिवसासाठी यायचा नुसता बहाणा करणार असेल तर त्यापेक्षा न आलेला बरा – उगीच दुधात मिठाचा खडा!" कावलेली सासू म्हणाली –

"येऊ दे तर खरं! मग बघू काय करायचे ते" सासरा निर्विकारपणे म्हणाला आणि बाहेर निघून गेला. त्याची त्रयस्थासारखी, कामापुरते एक दिवस राहण्याची भाषा त्या दोघांनाही फार बोचली होती – शिवाय रेणूची एका शब्दानेही त्याने चौकशी केली नव्हती – हे तर त्यांना फारच खटकलं होतं. त्यांचं सारं विश्व आता रेणू भोवतीच गुंफलेलं होतं. रेणू आता मात्र मनातून अगदी अगदी खट्टू झाली – मुलांना तिनं पत्राबद्दल काहीच सांगितलं नाही. पण लग्नाचा दिवस जसजसा जवळ येत चालला तसतशी तिच्या मनाची नुसती उलघाल सुरू झाली – हातांनी ती कामाचे ढीगच्या ढीग उपसत होती-लग्नसमारंभ साधाच असला तरी घरातच होता – नाही म्हटलं तरी तरी दोनशे-तीनशे माणसं येणार होती-घर गजबजून जाणार होतं! घरची कर्तीसवरती ती एकटीच! एका क्षणाची उसंत मिळत नव्हती-पण मनही फार अस्वस्थ झाले होतं – आतून अगदी गदगदून येत होतं –

मानवेंद्र, ललिताचा भावी पती, सहज एकदा भेटायला आला असता तिला म्हणाला, "ममा, ललिताच्या डॅडींना इंग्लंडला लग्नाबद्दल पत्र पाठपाठवलं की नाही? त्यांना बोलवायला

तर हवं " –

तिने चटकन् श्रीनाथचं पत्रच ललिताच्या देखत त्याच्या हातात दिलं. अजय, तिचा थोरला मुलगा तिथेच बसला होता –मानवेंद्राने पत्र मोठ्यांदा वाचलं – ते ऐकता ऐकता ललिता ताडकन् उठून उभी राहिली –

" ममा, हा माणूस देवकबिवक ठेवणार असेल तर मी लग्न रजिस्टर पद्धतीने करणार – आणि तो जर त्याही लग्नासाठी या घरात आला तर मी घराच्या बाहेरच पडेन – सांगून ठेवते. मग याने माझ्याशी लग्न नाही केलंन् तरी चालेल...त्या माणसाचं मला तोंड पाह्यचं नाहीय'– आय हेट हिम लाईक एनीथिंग..." संतापाने तिच्या तोंडून पुढे शब्दच उमटेना – आपल्या खोलीत ती तरातरा निघूनच गेली.

" पुरे गं ! आपल्या वडिलांविषयी असं बोलू नये एवढंही तुम्हाला कळत नाही ? कधी नव्हत ते घरी यायला निघालेत...तर... तुम्ही हे असं..." तिचा गळाच भरून आला–अगदी बोलवेना–डोळेही काठोकाठ भरले – थरथर कापत ती मटकन् खुर्चीवरच बसली –

" ते जर आता घरी आले तर मी लाथ मारून बाहेर हाकलवून देईन त्यांना...सांगून ठेवतो ममा...आम्हाला विचारल्याशिवाय तू आधी त्यांना बोलावलंसच का ? त्यांचा आपला काय संबंध ? मी आणि ललिता असं समजतोय की आम्हाला बापच नाहीय – आमचे आईबाप सर्व काही तू एकटीच !" अजयही जागचा उठून तिच्याजवळ येत रागाने म्हणाला –

तिला गरगरायलाच झालं. सासूसासऱ्यांनी किंवा तिने आजवर एकदाही मुलांच्या मनात असा विखार पसरविण्याचा चुकूनदेखील कधी प्रयत्न केला नव्हता–हे विषारी बीज रुजलं केव्हा, इथपर्यंत वाढलं केव्हा, फांद्याफांद्यांनी दोघाच्याही मवोमन इतकं पसरलं केव्हा हे तिला कळलंच नव्हतं–मुलाचा एकंदर पवित्रा पाहून ती एकदम खचूनच गेली.

' मानवेंद्र, तूच या दोघांची समजूत काढ बाबा–इतक्या वर्षांनी वडील त्यांना भेटायला येताहेत–पण यांना काही आहे का त्याचं ? तू तरी काही-तरी सांग यांना '

अजय तर उभ्याउभ्याच चवताळून लालेलाल झाला–पायाने वेस्ट पेपर बास्केट ठोकरून उडवून देत ओठ खात म्हणाला, ' काही सांगायला नकोय त्याने आम्हाला आमचे ते कोण म्हणून आम्हाला त्यांचं काही वाटावं ? इतक्या वर्षात कधी एक पत्र नाही, एक छदाम पाठवलेला नाहीय, आम्ही जिवंत की मेलेलो याची वास्तपूस्त सुद्धा नाही... ते आमचे कोण ? तुला खरं सांगतो ममा, फूटबॉल टीमचा मी कॅप्टन होतो आमच्या कॉलेजचा ! इतके कप्स, इतक्या ढाली, इतके चषक मिळवलेत मी आतापर्यंत ! याचं कारण एकच– प्रत्येक वेळी फूटबॉल समोर आला मी त्याला डॅडी समजायचो आणि अशा आवेगाने झणझणून तिरीमिरीने जोरदार लाथ मारायचो की बस्स ! जास्त आता काही सांगत नाही–पण ललिताच्या लग्नाच्या किंवा दुसऱ्या कुठल्याही निमित्ताने ते आता इथं येणार असतील मी फूटबॉलसारखी

लाथ मारून त्यांना बाहेर घालवीत–नाहीतर मी तरी घराबाहेर पडेन–आम्ही तर कधीपासूनच समजतोय की आम्हाला बापबीप कोणी नाहीच. तसंच तू का नाही समजत की आपल्याला नवराबिवरा कोणी नाहीय म्हणून? तोडून टाक ते मनातले सारे संबंध–स्वार्थी हलकट माणसाची बायको म्हणवून घ्यायला तुला खर म्हणजे कसंतरीच वाटायला पाहिजे–आम्ही तर त्याचा लहानपणापासूनच द्वेष करतोय– वुई हेट हिम लाईक ए डॉग! चुकून कधी आलाच तर लाथाबुक्यांनी झोडपून काढीन त्याचा संताप त्याच्या चेहेऱ्यावर मावेना–कपाळावरच्या शिरा तटतटून ताड्ताड् उडायला लागल्या.

मानवेंद्राने दोघांनाही आवरण्याचा, समजूत घालण्याचा आटोकाट प्रयत्न केला पण व्यर्थ! द्वेष लहानपणापासूनच मनात पक्का रुजला होता–त्यांनीही लहानपणी डॅडीची आठवण होती तोवर कधी काळी लाडाची, रुसण्याची, अर्ज विनंतीची वेडयावाकडया अक्षरांची पत्रं पाठवली होती–पण एकालाही उत्तर आलं नव्हतं–वाट बघन बघून पोरं थकली होती. आईची अवस्था पाहून मनातल्या मनात थिजली होती–इतके दिवस स्पष्ट बोलली नव्हती एवढंच. आज अचानक त्यांनी पेट घेतला होता–आणि या ज्वाळांचे स्वरूप फार भयंकर होतं–रेणूला सहन होण्यासारखं नव्हतं–

पण अखेर तिने कापऱ्या हातांनी पत्र लिहायला घेतले, 'मुलांची इच्छा आहे की आपण इथं येऊ नये–कुठल्याही निमित्ताने येऊ नये...कारण त्यांचं तुमचं आता कुठलही नातं उरलेलं नाहीय...मला मात्र खूप वाटत होतं की या निमित्ताने का होईना पण तुम्ही यावं, आम्हाला भेटावं...खूप वर्षं गेली हो मध्ये...खूप वर्षं गेली–तरी माझं नातं कायम आहे...मनात, रक्तात ते भिनलेलं आहे...पण इतकी वर्षं तुमच्यापुढं काही चाललं नाही...तसंच आता मुलांपुढंही माझं काही चालत नाहीय...खरंच चालत नाहीय...तेव्हा तुम्ही येऊ नये...

● ● ●

---

■ 'सुरूंग' या नव्या नाटकाच्या 'नवशक्ती'तील परीक्षणात म्हटले होते: 'सुरूंग' नाटकातील नायक महेश याची व्यक्तिरेखा हॅम्लेटहून वेगळी व अधिक संमिश्र, विविधरंगी आहे.

हॅम्लेटसारखी व्यक्तिरेखा मराठी नाटकात आली की ती हॅम्लेटपेक्षा अधिक श्रेष्ठ होते, हे वाचकहो, तुम्हाला माहीतच असेल.

■ याच नाटकाच्या 'महाराष्ट्र टाईम्स'-मधील परीक्षणात म्हटले होते: शेट्टी या उडप्याच्या हॉटेलात महेश बॉय म्हणून नोकरीला असताना तो मालकाचा हात पिरगाळतो, दमदाटी देण्यासाठी. उद्दाम उडपी हॉटेलमालक हे सहन करणे शक्य आहे?

महेश शिवसैनिक असल्यास तेच शक्य आहे.

# भारतीय चित्रपटसृष्टी : ६०
# एक धावता आढावा

## शशिकांत किणीकर

तो इथे जन्मला सात जुलै १८९६ ला. त्याच्या जन्माचे केवढे कुतूहल. केवढा आनंद, आता त्याच्या जन्माला पंचाहत्तर वर्षं झाली. आता तो केवढा वाढलाय. आभाळाएवढा. आभाळातल्या चांदण्याएवढ्याच तो स्वप्नील राह्यलाय.

तो जन्मला त्यावेळी त्याला बोलता देखील येत नव्हते. तो नुसते सरकायचा पुढे पुढे. तरी त्याचे कौतुक. ज्यांनी त्याला पाहिले. त्यांना आपल्यावर कुणी तरी जादूची कांडी फिरवल्यासारखे वाटायचे. स्वत: भाग्यवान आहोत असे वाटायचे. त्याला न पाहिलेल्यांना ते म्हणायचे, 'तुम्ही पहाच ना एकदा!' आणि तेव्हापासून त्याला सगळे डोळे भरभरून पहाताहेत.

या पंचाहत्तर वर्षांच्या काळात त्याने किती विलक्षण कडूगोड अनुभव घेतले. किती वळणे घेतली. किती रूपे घेतली.

त्याचे नाव चित्रपट. गेल्या शतकाच्या अखेरीस तो इथे आला. त्यापूर्वी इथल्या लोकांनी केवळ स्वप्नातली सरकती दृष्ये पाह्यली होती. आणि ७ जुलै १८७३ ला मुंबईच्या काळ्या घोड्या-जवळील वॅटलसन हॉटेलमध्ये रसिकांनी चित्रपटाचे स्वप्न जागतेपणी पाहिले. फ्रान्सच्या ल्यूमिअर बंधूंनी हे घडवून आणले. त्यावेळी लंडनमधील रस्त्यां-वरील नृत्यांची, चित्रपट निर्मितीच्या प्रवेशाची अशी अनेक दृश्ये प्रेक्षकांनी डोळे भरून पाहिली. आणि नंतर नॉव्हेल्टी चित्रपटगृहात लोक रोजच त्याच्या दर्शनासाठी गर्दी करू लागले.

त्याच्यातील चैतन्यामुळे सर्वजण स्तिमित होत. त्याच्या जिवंतपणाशी एकरूप होत. चित्रपटाच्या दृश्यातली एखादी आगगाडी धाऊ लागली किंवा समुद्राची लाट उसळली की लोक अक्षरश: क्षणभर आपली खुर्ची सोडत.

पुढे काही दिवसातच तो भारतीय जीवनाशी नाते सांगू लागला. जत्रा, प्राचीन अवशेष, वास्तू, नाटके यांचे तो दर्शन घडवू लागला. आणि मग इथल्या व्यक्तिमध्येही त्याच्या निर्मितीचे स्फुरण चढले. त्याची बीजं फुलारू लागली. आणि १९०० सालात हरिश्चंद्र भाटवडे-

कर उर्फ सावे दादा आणि एफ्. बी. थानावाला यांनी काही भारतीय चित्रे प्रदर्शित करायला सुरूवात केली. ह्या चित्रांचा जीव त्यावेळी अगदी लहानसा होता. पण त्या तान्ह्या जिवातही फार मोठी शक्ती होती. कधी वानरांचे शिक्षण; कधी कुस्त्या असे त्यांचे विषय असत. चित्रण अबोल पण चैतन्यमय. त्याचवेळी कलकत्त्याला 'अलीबाबा' 'बुद्ध' अशा नाटकांचे चित्रण हिरालाल साननी केले. सावे दादांनी काही वार्ता चित्रे काढली. भारतातील पहिले गणितज्ञ र. पु. परांजप्यांच्या सन्मानाचं चित्रण त्यांनी केलं.

असे त्याचे लघुचित्रांचं आयुष्य जवळ जवळ सोळा वर्षांचे. यावेळेपर्यंत परदेशातून सिंड्रेला, जोन ऑफ आर्क, शेक्सपियरची काही नाटके चित्रित होऊन इथं येत होती. त्यापासून स्फुरण घेऊन एन्. जी. चित्रे आणि आर. जी. तोरणे यांनी संत पुंडलिकाच्या आयुष्या-वरचं चित्रण केलं. लोकांनी तुफान गर्दी केली. त्याच्या पुढील वर्षांत म्हणजे १९१३ मध्ये कै. दादासाहेब फाळके यांचे 'राजा हरिश्चंद्र' हे ३७,०० फूट लांबीचे कलात्मक चित्र जन्माला आले, तेव्हापासून दादासाहेबांनी चित्रपट निर्मितीसाठी जे अविश्रांत कष्ट घेतले, व्यथा सोसल्या त्या शब्दांकित करणे अशक्यच आहे. भारतीय चित्रपटाचे ते जनक ठरले.

चित्रपटाला सर्व अर्थानं स्वदेशी करून त्याच्या पूर्णत्वासाठी ते अखंड राबत राहिले. राजा हरिश्चंद्र, लंका-दहन, कालिया मर्दन अशी त्यांची पौराणिक चित्रे लोकांच्या जीवनाचाच एक भाग होऊन राहीला.

हळू हळू चित्रपट निर्मितीचं क्षेत्र विस्तारू लागले. एस्. एन्. पाटणकरांनी राम-वनवास, कबील-कमल अशी चित्रे प्रदर्शित केली. पहिलं सामाजिक चित्र धिरेन गांगुली यांनी 'इंग्लंड रिटर्नड' नावाचं तयार केले. त्यापासून मुंबईतील होमी माल्टरनी प्रेरणा घेतली आणि 'काळा नाग' हे चित्रं काढले. चित्र-पटाचा जीव आता असे आकार आणि आशय शोधू लागला. कोल्हापूरच्या बाबूराव पेंटरांनी तर चित्रपटाला फार कलात्मक परिमाणं दिली. याचवेळी सुचेत सिंग यांनी चित्रपटात परदेशी कलावंतांनाही स्थान दिले. आणि डोरोथी किंग्डम ह्या अमेरिकन नटीने चक्क शकुंतलेचे काम केले.

आणि १९२० पासून चित्रपट निर्मि-तीचे वेड जरा जोमाने वाढू लागले. मग हळूहळू चित्रपटाचे कायदे आले, सेन्सॉर आले. आणि मग निरनिराळे कलावंत चित्रपटांच्या तंत्राचा मंत्राचा विचार करू लागले.

श्री. अर्देशिर इराणींनी अनेक मूक चित्रपट तयार केले. कै. बाबूराव पेंटरांच्या महाराष्ट्र फिल्म कपनीत वाढलेल्या व्ही. शांताराम यांनी दामले, फत्तेलाल यांच्या सहाय्याने प्रभातची स्थापना केली. 'उदयकाल' या त्यांनी निर्माण केलेला एक महत्त्वाचा मूकपट त्याचवेळचे बाबूराव पेंटरांचे 'सावकारी पाश' हे एक अभूतपूर्व वास्तववादी

चित्र, चंदुलाल शहांनी 'गुण सुंदरी', 'भानेली भामिनी' सारखी कौटुंबिक नाटके चित्रित करून आणखी एक वेगळीच दिशा सुचवली. मग जे. बी. एच. वाडीया, नवल गांधी अशी अनेक माणसे चित्रपट विकसित करण्यासाठी श्रमू लागली १९२८ च्या सुमारास फतमा बेगम या नटीने मुंबईत स्वतःची चित्रपटनिर्मिती संस्था काढली. ह्या क्षेत्रातली ही पहिलीच स्त्री. मादन थिएटर्सचा 'कपाल कुंडल' हा चित्रपट म्हणजे भारतातला पहिला रौप्य महोत्सवी चित्रपट.

देवकी बोस, पी. सी. बारुआ, नितिन बोस, ए. आर. करदार इ. अनेकांनी मूक चित्रपट निर्माण केले. चित्रपट मूक होते तरी प्रेक्षकांच्या हृदयाला भिडणारे होते. प्रेक्षकांच्या 'हसू आणि आसू'शी त्यांचे प्रत्यक्ष नाते होते. चित्रपट निरागस बालकाप्रमाणे आपला अविष्कार सहज दाखवायचे आणि प्रेक्षकांना त्या सहज लीला मोहीत करायच्या. याचवेळी मग चित्र-वृत्त व्यवसायाला आवाहन मिळाले. जयशंकर देविदास यांचे 'मौज मजा' आणि नगिनदास शहांचे 'चित्रपट' ही पहिली चित्र-वृत्त-पत्रके प्रसिद्ध होऊ लागली.

आणि १९३१ मध्ये चित्रपट बोलू लागला कलेच्या ह्या मध्यमात फार अपूर्व अशी भर पडली अर्देशिर इराणी यांनी १४ मार्च १९३१ रोजी 'आलम आरा' पहिला बोलपट सादर केला. त्यानंतर लगेच इराणींनी 'नूरजहाँ' आणि हिमांशू रॉय 'कर्म' हे बोलदट प्रदर्शित झाले. पुढे बोलपटांचा पूरच येऊ लागला. चित्रपट केवळ बोलू लागले. मादन थिएटर्सने 'शिरी फरहाद', 'लैला मजून', 'इंद्र सभा' असे अतिशय लोकप्रिय चित्रपट निर्माण केले. त्यात गाण्यांना अतिशय प्राधान्य होते. परंतु व्ही. शांताराम, देवकी बोस आणि बारुआ यांची प्रतिक्रिया थोडी वेगळी झाली. त्यानी चित्रपटांना गंभीर कथा वस्तू दिल्या. छायाचित्रण, ध्वनी, संपादन यांचा सूक्ष्म विचार करायला सुरुवात केली.

कलकत्याचे 'न्यू थिएटर्स' मुंबईचे 'बॉंबे टॉकीज' आणि पुण्याच्या 'प्रभात'ने उत्कृष्ट बोलपटांच्या निर्मितीत तुफानी भर घातली. देवदास, मुक्ति, विद्यापती, अधिकार, जिंदगी, धर्मात्मा अशी एकापेक्षा एक सरस अशी न्यू थिएटर्सने चित्रे निर्माण करून स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले. प्रभातने अमृत मंथन, कुंकू, आदमी (माणूस), पडोसी (शेजारी)–अशी हिंदी व मराठी अपूर्व चित्रे निर्माण केली. त्यातून दिग्दर्शन म्हणजे काय त्याचेच उत्कृष्ट धडे शांतारामबापूंनी चित्रपटसृष्टीला दिले, 'राजकमल' संस्थेतून डॉ कोटणीस, रामजोशी दहेज, दो आँखे बारह हाथ ही चित्रे शांतारामनी दिली, अछुत कन्या, कंगन, बंधन झूला, किस्मत या चित्रपटांची बॉंबे टॉकीजने मौलिक भर घातली. 'किस्मत चित्रपट कलकत्त्यात चार वर्षे चालला होता.

सोहराब मोदींनी पुकार, सिकंदर

ही चित्रे निर्माण करून एक एक नवीन प्रेक्षक वर्ग निर्माण केला, जे. बी. एच. वाडी यांचा 'कोर्ट डान्सर' हा चित्रपट हिंदी, बंगाली आणि इंग्रजीतून अवतरला.

जातीय असमानतेवरील बिमल रॉय यांचे 'हमराही' एक उत्कृष्ट निर्मिती होती. के. ए. अब्बास यांच्या 'धरती के लाल' अणि चेतन आनंद यांच्या 'नीछा नगर' या चित्रपटांनी तर परदेशातही किर्ती मिळवली. व्ही. शांतारामचा 'डॉ. कोटणीस हा परदेशातून जाऊन इंग्रजीत आपली कथा सांगून आला. इकडे दक्षिणेत मग जेमिनीला जाग आली. 'चंद्रलेखा'च्या निर्मितीने त्याने हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. उदय शंकर यांच्या 'कल्पन', चित्रपटाला बेल्जियममध्ये ॲवार्ड मिळाले...

असा अनेक परींनी चित्रपट वाढत होता. नवनवी रूपे घेत होता, चित्रपटांचे हे युग म्हणजे परिश्रमांचे युग होते. प्रत्येक गोष्टीसाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागे. साधनसामुग्री मिळवताना कोण सायास पडत. हे अस्सल कलावंताचे आणि अहोरात्र कष्टणाऱ्यांचे, चिंता करणाऱ्यांचे युग होते. केवळ ऐषआरामी लोकांचा बाजार नव्हता.

चित्रपट असा विकसित होत असतानाच त्याला रंग हे माध्यम मिळाले. आणि मग कला अधिक सधन होऊ लागली. एम्. भवानी यांची त्यांचा 'अजित' चित्रपट रंगवला. त्यानंतर थोड्याच वर्षांत 'आन', 'झनक झनक पायल बाजे' आणि साहेराब मोदीचा 'झासी की रानी' (१९५३) हे रंगीत चित्रपट स्वप्नांसारखे उभे राहिले.

चित्रपटांचा 'नवा जमाना' सुरू झाला राजकपूरच्या चित्रपटामुळे. बरसात, आवारा, श्री ४२० व मेहबूबचा 'अंदाज' ह्या दर्दभऱ्या सामाजिक चित्रपटांनी चित्रपटकलेला व व्यवसायाला खरोखरी समृद्धी दिली. उत्कृष्ट संगीत, उत्कृष्ट अभिनय, उत्कृष्ट समस्या यांची स्पष्ट व खोल जाणीव निर्माण झाली.

'सत्यजित रॉय' हे तर चित्रपटसृष्टीला एक वरदानच ठरले. पथेर पांचाली, अपूर संसार, अपराजितो, जलसागर, तीन कन्या, महानगर, चारुलता, नायक... अशी अनेक अनमोल चित्रे सत्यजितनी दिली. त्यांचा चित्रपट सृष्टीतला वाटा हा केव्हाही सिंहांचा वाटा आहे.

त्यानंतर बिमल रॉय, गुरूदत्त, देवआनंद इ. अनेकांनी चित्रपट संपन्न केला. सर्वांचा यथासांग इतिहास देणे हे या ठिकाणी अशक्य आहे. शिवाय अगदी अलीकडचा इतिहास हा बहुतेकांच्या डोळ्यासमोरच आहे. अनेक गोष्टी, अनेकांचे उल्लेख राहून गेले आहेत. परंतु ते सर्व केवळ या लेखाच्या मर्यादित स्वरूपामुळेच होय.

ह्या वर्षी भारतीय चित्रपटसृष्टीला साठ वर्षे पूर्ण होत आहेत म्हणून केवळ हा धावता आढावा घेतला. ●

[श्री. फिरोझ रंगूनवाला यांच्या सहकार्याने]

# हाय, मोगलाई !

आता भूतकालात जमा झालेल्या हैद्राबाद संस्थानाचा मी. हैद्राबाद बदलत, सुधारत आणि बिघडत असताना मी लहानाचा मोठा झालो. म्हणजे बदलणें, सुधरणे आणि बिघडणे हा क्रम असाच निश्चित समजणें वस्तुस्थितीला धरून होणार नाही, तो उलट करता येईल. पण उलटा-सुलटा करूनही त्या काळाची आणि प्रक्रियेची खरी खुरी कल्पना यावयास बदल, सुधार आणि बिघाड ही सामाजिक जडण-घडणहीं संमिश्र स्वरूपाची होती हे लक्षात ठेवणे जरूर आहे. कोणतीही सामाजिक प्रक्रिया अशीच असते. केव्हाही एकमार्गी नसते.

हैद्राबाद संस्थानात मुस्लिम राज्यकर्ते अल्पसंख्य. पण ज्यांचेवर त्यांचे राज्य ' चालं ' करून होते ते बहुसंख्य हिंदु. तरीही हिंदूंना हिंदु म्हणवून घेण्याची मुळीच लाज वाटत नव्हती. या हिंदूत ऐंशी लाख तेलगू, चाळीस लाख मराठी आणि वीस लाख कानडी होते. उरलेल्या पंचवीस लक्षात वीस लक्ष यवन आणि इतरात ख्रिश्चन, पारशी इ. होते. मूळच्या संस्थानी हिंदूवर आणि त्यात मराठी माणसावर राज्यकर्त्यांचा जबाबदारी टाकण्याच्या बाबतीत पूर्ण विश्वास नव्हता, यामुळे उत्तर भारतातले कायस्थ, खत्री आणि दक्षिण भारतातले मद्रासी यांचा शासनात काही प्रमाणात शिरकाव झालेला होता. याचबरोबर उत्तर प्रदेशातले शिया मुसलमानही होते. शासनात यांची पखरण चिवडचातल्या बेदाण्यासारखी झाली होती. निदान तशी वाटत तरी होती.

सामान्य माणसास दैनंदिन जीवनात फक्त दोन जमातीच जाणवत. एक शासन करणारा व दुसरा शासित, प्रजेचे एकंदर चलन-वलन एक-मेकाबद्दलच्या आंतरिक ओढीने आणि आस्थेने उत्तेजित व उर्जित होती तरी ही नात्याची नवलाई समाजातील खालच्या थरापर्यंत गेलेली नव्हती. जमीनदार घराणे, आर्यसमाजाचे वळण, नंतर हैंद्राबाद स्टेट कॉंग्रेसचे राजकारण, मग शिक्षणाकरता पुणे-मुंबई आणि शेवटी पोलीस ॲक्शननंतर तेथेच नोकरी अशा सर्व संस्कारातून आणि स्थित्यंतरातून माझ्या मनावर काही ठसे उमटले, त्याचे हे चित्रण, वास्तविक हे ललित चित्रण आत्मवृत्तात्मक शैलीतले आहे, कारण स्वानुभूती व परानुभूती याना माझ्या व्यक्तिमत्वातल्या सहानुभूतीने एकजीव केले. म्हणून

आत्मवृत्तात्मक शैली असली तरी ते आत्मविवेदन नाही. पण ' आत्मा ' जो आहे तो स्थूलार्थाने-नव्हे. अर्थात, ज्यांना सत्य आणि कल्पना यांची फारकतच करायची आहे त्यांना, मला वाटते, ललित लेखकाजवळ पटण्यासारखा युक्तिवाद नसतो. असल्यास तो सांगण्यात स्वारस्य ते काय ? ललित साहित्यात कुठे सत्य सुरू होते आणि कल्पतेला भिडते किंवा कल्पनेचा संचार केव्हा सुरू होतो आणि सत्याला आपल्या झेपेत केव्हा घेतो हे खरेच सांगणे सोपे आहे काय ? पण एक मात्र स्पष्ट केले पाहिजे की, या साऱ्या लिखाणात प्रकरणे स्वतंत्र वाटली तरी आतला प्रवाह हैद्राबादी मानवी जीवनाचा पिंड कळणारा स्त्रोत तरलपणे सुचवण्याचा आहे.

अशी ही बांधिलकी एकंदर तेरा प्रकरणांची असली तरी त्याचे तीन विभाग पाडण्यात आले आहेत. तेहीं सूचक असून तेथील जीवनाच्या अंतस्थ प्रवाहाची परिमाणे दाखविणारी आहेत.

१ : दिवाणखाना. मोगलाईतल्या काही वाड्यातील, घरातील हॉलला म्हणतात. त्या त्या वाड्यातील किंवा घरातील लहानाचा मोठ्या होणाऱ्या व्यक्तीचा बाहेरच्या जगाशी या दिवाणखान्यांतून परिचय व्हायचा व संबंध यायचा. येथून त्याचे आत-बाहेर सुरू व्हायचे.

२ : चँदनी. बैठकीवर जी पांढरी चादर घालतात ती. जेवावयाच्या टेबलावर किंवा जागेवर जी पांढरी चादर घालून दस्तरखान सजवण्यात येतो त्याला पण हेच नाव. यात बराच अनौपचारिक भावनिक आणि भोगप्रधान संपर्क ' अभिप्रेत ' आहे.

३ : इजलास : अधिकारी, न्यायाधीश, मंत्री इ. इ. ज्या खोलीत व ऑफीसात बसतात त्याला इजलास हे नाव. बाहेरच्या जगातल्या व्यवहाराचे हे छोटचा-मोठ्या प्रमाणात खुर्ची भूषवणाऱ्या व्यक्तीला अनुसरून केन्द्र. संस्थानात व्यावसायिक व शासकीय संबंध ठेवण्याचे ' इजलास हे एक साधन.

—म्हणजे, दिवाणखाणा वैयक्तिक संबंधाचा, चँदनी सामाजिक नात्याची आणि इजलास राजकीय (मर्यादित संस्थानी अर्थाने) संपर्काचा अशीं ही तीन संस्थानी जीवनाची अंगे होती. प्रकट-अप्रकट आयुष्याचा विलास, विकास, विलय आणि विजय यातून प्रस्फुटे. त्याचे विश्लेषण करायच्याऐवजी त्याची ' झाकी ' (Glimpse) येथे लेखनांकित केली आहे. ती वाचताना ते संस्थानी जीवन काय होते याची मानवी कल्पना आली तरी पुष्कळच झाले.... इ. स. १९३० ते १९५६ चा हा काळ—

—सिनिक्

हाय, मोगलाई ! भाग पहिला : दिवाणखाना

# एक : पाऱ्या

आंग्ल भारतात असहकाराची चळवळ सुरू झाली तेव्हा निझाम संस्थानातल्या एका खेड्यात--

डोळे चोळत उठलो तो नेहमीची दृश्ये मला दिसली नाहीत. आळसटलेल्या शरीराने लोळत लोळत ज्या माझ्या अण्णांच्या मांडीवर तशा स्थितीत मी काही वेळ सुस्तावत असे ते अण्णा तिथे नव्हते. त्यांच्या वाणीतून स्त्रवणारे संतवाङमयाचे श्लोक, अभंग ओव्यांचे मंजूळ स्वर कानावर पडले नाहीत. रोज अंगणात तुळशीभोवती सडा घालणारी जनाअत्या दिसत नव्हती. पारिजातकाची फुले टिपावयास आलेली वेणूवासंतीही आज अधिक मुग्ध वाटली. वातावरणातील एकंदर निस्तब्धता अस्वस्थ करणारी होती. अजून पडून रहावयाचे वळण शरीराला पडले होते तरी जी चलबिचलता मनाला ग्रासून होती तिने मला उठवले.

मी उठलो आणि अण्णा दिवाणखान्यांत असतील या अपेक्षेनं तडक बंक ओलांडून तिकडे गेलो. कधी कधी रामप्रहरीच मंडळी त्यांना भेटावयास येत तेव्हा दिवाणखान्यात ते जात. परंतु असे झाले म्हणजे गजबजलेल्या दिवाणखान्याचे अस्तित्व तेथील आवाजावरून थेट आतील लोकांना पण जाणवे. आज खुद्द दिवाणखान्यांत अण्णा एकटेच बसले होते तेव्हा आज काहीतरी वेगळे घडले आहे हे नक्की होते. ते उघड दिसत नव्हते. परंतु घरातील एकंदर वातावरण नेहमीसारखे गतिशील व क्रियाक्षम नव्हते. ते संथ झाले होते. या संथपणात निश्चितता नव्हती. निरुत्साह होता. मला एकदम खटकले की, घरातील वडीलधाऱ्यांना काय झाले हे माहीत असून मी लहान असल्यामुळें मला ते कळले नव्हते.


दिवाणखान्यांत अण्णा केवळ एकटेच बसले होते असे नव्हे. ते नेहमीप्रमाणे प्रसन्न दिसत नव्हते. दोन्ही गुडघ्यावर त्यांची हनुवटी टेकली होती. कुणाला दिसत नव्हते अशा अदृश्य कुणाबरोबर तरी त्यांचा गंभीर विचारविनिमय चालल्यासारखे वाटले मला. इतके गंभीर आणि अबोल मी त्यांना कधीच पाहिले

नव्हते. अबोल असूनही इतके बोलके व गुंतलेलेही मला ते कधी दिसले नव्हते. घरात नसल्यासारखे बसले होते. हे अण्णा मला सर्वस्वी अपरिचित होते. नवे होते. परके होते. आकर्षक नव्हते... मला तर त्यांच्याजवळ जाण्याचे क्षणभर भय वाटले.

माझे पाय थबकले. पन्नास—पाऊणशे माणसे ह्या दिवाणखान्यात सहज बसू शकत, ज्या दिवाणखान्यात त्या माणसांना असा नेहमी सल्ला देत, मार्गदर्शन करीत, ज्या दिवाणखान्यांत तालुकदारही अण्णांच्या बरोबर लोडाला टेकून बसे, त्या दिवाणखान्यांत अण्णांना असं निर्जन बेटावर बसल्यासारखं पाहून मी चरकलो. नेहमीचा रुबाब आणि दबदबा नव्हता. सवयीची गजबज नव्हती. मी नुसता पाहत राहिलो. त्यांचे मजकडे लक्ष नव्हते. लक्ष गेले नाही. मला वाटले की, काहीतरी बारीक हालचाल करावी आणि त्यांचे लक्ष वेधावे. आपल्या अस्तित्वाची जाणीव करून द्यावी. मी आलो आणि त्यांचे लक्ष गेलं नाही असं मुळी कधी झालंच नव्हतं. कितीही माणसं आणि कोणताही प्रसंग असो मजकडे दुर्लक्ष व्हायचंच नाही. मायेच्या हाताचा पाठीला स्पर्श आणि त्या हाताची बोटे कपाळावर झेपावलेल्या झुलुपांना नीट करावयास हळुवारपणे फिरताहेत असा जवळकीचा क्रम असावयाचा. ही चवळीक अनुभवास न आल्याने एका क्षणात मला परकेपण ग्रासलं. पोरकंपण जाणवलं. अधांतरी फेकला गेलो आहे अशी पोकळी मनाला व्यथित करून राहिली.

माझ्या पायाजवळ कुरतडलेल्या अन् कुस्करलेल्या झाडाच्या पानाचा पसारा वाढत होता. बेचैन मनाचा हा आविष्कार चालूच होता. मनाला अभय हवे होते. ते हरवले होते. जोरात ओरडून सांगावे की, अण्णा मी येथे आहे, मला पाहा ना ! पणआवाज उमटत नव्हता. गुदमरल्यासारखे झाले होते. माझ्या पायाजवळ फुलांची कुंडी होती. ती याच अवस्थेत माझ्या पायाचा धक्का लागून पडली. किती मोठा आवाज वाटला कुंडीच्या पडण्याचा त्या निशब्दतेत. अण्णा रागावले तर ? छे, छे, पण अण्णा रागावतच नाही. त्यांना रागावलेलं मी पाहिलंच नव्हतं. त्यांना रागावताच येत नव्हतं. पण आज मात्र रागावतील. कारण आजचे अण्णा हे आपले अण्णा नव्हतेच. हे अण्णा जावेत आणि माझे अण्णा यावेत. या आवाजाने ते परतावेत. अन झाले तसे काही तरी. अण्णा पुटपुटले, 'होय, दामू तू उभा आहेत' अण्णांनी पुटपुटलेले हे हे शब्द कानावर पडून विरतात न विरतात तोच टप्टप् चा भूमीला हादरा सुरू झाला आणि पाहता पाहता चमचमणारा काळाभोर एक जबरदस्त अरबी घोडा दिवाणखान्यासमोर उभा राहिला.

त्या घोड्याला पहाताच मी सारी खंत विसरलो. आपल्यात परत आलो. मधून मधून जेव्हा केव्हा हा घोडा आमच्याकडे येई तेव्हा तेव्हा सारे सोडून आणि विसरून मी त्याच्याकडे 'एक-



काय सांगू हैदर ! मला काही सुचेनासं झालं आहे

टक ' होई. त्या घोड्याइतके शानदार दुसरे कुणीही नाही असे वाटे. आज तर तो मला फारच भव्य दिसत होता. त्या घोड्याबद्दल मला जो अनिवार मोह होता त्याचं आणखीन एक कारण फार महत्त्वाचं होत. मला त्याच्यावर निदान एकतरी चक्कर मारावयास मिळे. आज त्या घोड्यावर बसून खूप खूप दूर जावयाचे आणि मग अण्णा आपल्यास शोधावयास निघतील...मी असे मनसुबे रचत होतो तोच मी उचलला गेलो. पाहतो तो मी हैदरहुसेनच्या कडेवर होतो आणि तो आण्णांकडे जात ' आदाब महाराज–' म्हणाला...

तो घोडा हैदरहुसेन पोलीसपाटलाचा होता. पूर्ण जिल्ह्यात कुणाजवळही तसा घोडा नव्हता. जसा घोडा नव्हता त्याप्रमाणेच त्या पंचक्रोशीत तसा पोलीस पाटील नव्हता. अजब दरारा होता त्याचा. खुद्द ' माझ्या ' जवळ त्याचे वजन होते. तो म्हणेल ते खरं आणि वळेल ती दिशा असा सर्वमान्य खाक्या होता. ' रिआया ' त्याला थरथर कापे. गिरदावर, पेशकार, तहसिलदार आणि पोलीस अमीनही त्याला वचकून असत. तो कुणाकडे जात नसे. लवत नसे. दुनिया झुकवत असे. पण अण्णांच्याकडे मात्र तो येत असे.

आदाब बजावत असे. त्यांचं ऐकत असे. बोलत बसे. काही योग्य खिदमत असेल तर फर्मावा असं परोपरीनं विनवून पाही. कुणाविषयी चांगलं न बोलणारा तो, 'अण्णासारखा दानतीचा व दिल-वाला आदमी दुनियेत नाही' अस अभिमानाने सांगे. तो आमच्याकडे संध्याकाळी कधीच यायचा नाही. कारण तो 'तर्रर्' असायचा. माणसांच्या लिंगातच तशा वेळेस त्यांच्या भाषेची फिरत असे. ज्याच्यावर नाराज होई त्याच्यावर शिव्याबरोबर लाथाबुक्क्यांचा मारा होई. पण याही अवस्थेत तो अण्णांच्या कुळांना व माणसांना हात लावत नसे. त्रास देत नसे. त्या जमान्यात जात पात न पाळणारे, रोटी-बेटी व्यवहाराचा धर्मातीत पुरस्कार करणारे आणि कुणालाही कधीही विन्मुख न पाठवणारे अण्णा त्याला मोठे नेक वाटत. त्याला कधी अण्णांनी खाण्याकरता आत बोलावले तर घरात तो येत नसे. बाहेर दिवाणखान्यांतच थांबे व म्हणे 'तुमचे घर पाक आहे. मज-सारख्या विषयलंपट आणि व्यसनी माणसांनी ते विटाळू नये.'

असा हा हैदरहुसेन दिवाणखान्याच्या पायऱ्याजवळ क्षणभर थबकला. कदाचित त्यालाही अण्णांची ती सचिंत मुद्रा अनोळखी वाटली असावी. नेहमीसारखे ते प्रसन्न सदन नव्हते. 'या, या...' अशा भरपूर व भरदार आवाजाच्या स्वागताचा अभास होता. कदाचित हैदरहुसेनला प्रश्न पडला असावा की या धीर माणसाला हादरा देणारे असे काय बरे घडले असावे? हरिजनांना गोडापाण्याची विहीर नाही म्हणून याने चक्क गावात आपल्या घरामागची जागा व विहीर देऊन त्यांना बसवले तेव्हा सारा सवर्णीय समाज बिथरला व त्याने यांच्यावर बहिष्कार घालण्याची धमकी दिली तरी हा माणूस यत्किंचितही डगमगला नाही. ताठ उभा राहिला. एक वर्षात घरी पाठचा भाऊ मेला व सहा मुलांना सोडून बायको गेली तरी हबकला नाही. त्यानंतर ज्याच्यावर सर्वतोपरी विश्वास टाकला त्या मुनिमाने दगा देवून हजारो रुपयांना बुडवले तरी चेहऱ्यावरचे स्मित निवळले नाही. आर्य समाजी कामाशी पूर्णपणे संबंध तोडा नाहीतर तुमचे इनाम तोडू, रक्कम व इस्कॉल बंद करू अशा सरकारी तंव्यांना दाद दिली नाही. कण्यास बाक आला नाही. माथं नमलं नाही. असे अण्णा आज दिवाण-खान्यात मऊ होऊन बसले होते. कोण आलं-गेलं याचं भान न ठेवण्याइतका त्यांच्यातला गृहस्थ विचलित होता. हैदरहुसेनची गती मंदावली होतीच. हळूहळू पायऱ्या चढून तो आण्णांजवळ आला व पुन्हा म्हणाला 'आदाब महाराज–'

अण्णांनी त्याच्याकडे विकलतेनं पाहिलं व त्याला बसावयास खुणावलं. हा माणूस अजून जगात आहे याचा भाव हैदरहुसेनला विश्वास देवून गेला व तो बसत अण्णांना म्हणाला 'महाराज गुस्ताकी माफ करा, मी कधी तुम्हाला इतक्या खोफनाक फिकीरीत पाहिलं

नाही. माझ्या योग्य काही खिदमत असेल तर हुकूम कारा. बंदा हाजिर आहे–'

अण्णांनी एक नजर हैदरहुसेनकडे पाहिलं आणि अगदी खोल स्वरात म्हटलं 'काय सांगू हैदर?–वयात आलेला मुलगा घर सोडून, शिक्षण सोडून गेला....मला काही सुचेनासं झालं आहे. त्याची आई जाऊन एक वर्ष झालं. ती जाताना तिला मरण्याचे भय नव्हतं. आपल्या या मुलांची काळजी होती. बंद झालेली तिची वाणी आणि सताड उघडे डोळे अगदी श्वास गेल्यावरही या करताच मजवर रोखले आहेत असं मला तीव्रतेनं जाणवलं. निरोप घेताना तिचा कण्हणारा आत्मा जणू म्हणत होता, माझ्या मुलांना नीट खाऊ-पिऊ घाला आणि नीट वाढू द्या... अजून त्याला वर्षही पूर्ण झालं नाही.

'महाराज, आपण बिलकूल परेशान होऊ नका, कसम अल्लाकी, तुमच्या मुलाला परत आणेपर्यंत खाना नाही खाणार. कुठे जातो जाऊन जाऊन. बल्दिया शरिफ्ली पहिल्यांदा आताच पाठवतो. कोतवाल तर आपल्या शब्दाच्या बाहेर नाही. तालुकदार, अमीन यांच्याकडे आताच माणसं पिटाळतो.'

हैदरहुसेन उत्तेजित होऊन बोलण्याच्या गतीत आला होता. त्याला आडवत अण्णा म्हणाले, 'त्याचा काही उपयोग नाही...सरकारनच त्याला गिरफ्तार केलं आहे.'

'मग तर मुळीच अडचण नाही. हा चाललो खिशात अश्रफ्या घेऊन पाश्याकडे, 'संध्याकाळपर्यंत रिहा झालाच पाहिजे तुमचा नूरे नजर.'

'आपल्या सरकारनं नाही पकडलं. इंग्रज सरकारनं त्याला पकडून कैद केलं आहे.'

'मग त्यात काय? रेसिडेंट, व्हायसराय हे पाश्याच्या शब्दाबाहेर नाहीत. आपण आताच एक दरखास्त द्या. मी पाश्यांना फौरन सांगतो की, इंग्रज सरकारला पाशाच्या मोतब्बर रियाआला गिरफ्तार करण्याचे मुळीच कारण नाही. गलता फैयमी दिसते. तरी विनंती की,

'हैदर मला पूर्ण सांगू दे आणि मग तू उपाय सूचव,'

'मला ही तुमची हालत पाहवत नाही म्हणून अधीर झालो, माफ करा, महाराज.'

'इंग्रज सरकारनं या देशातून जावं व आमची आजादी द्यावी म्हणून तिकडे म. गांधींच्या प्रेरणेनं झगडा चालू आहे. त्या झगड्यात माझा मुलगा सामील झाल्याने पकडला गेला आहे. मला पकडला गेला किंवा त्यात सामील झाला याची खंत किंवा दुःख नाही.'

'मग कसलं दुःख? आपल्याला एक राजची बातमी सांगतो. महाराज, खुद्द पाशालाही खरं पाहिलं तर इंग्रजांचं वर्चस्व खुपतं. मी जरूर पाशाला सांगेन.'

'अरे पण, माझं पूर्ण ऐकशील तर. मला माझा मुलगा लढ्यात शरीक झाला याचा अभिमान आहे. मला त्याचं

मुळीच दु:ख नाही. मी कळवळतो आहे तो त्याला तुरुंगात बरोबर खायला मिळणार नाही म्हणून. ज्याला उशीची सुरकुती रुतत होती त्याला आता तरटावर झोप येणार नाही म्हणून. आपला मुलगा त्रासात आहे या वस्तुस्थितीमुळे त्याच्या आईच्या आत्म्यास काय वाटेल – सारखी ती माझ्या डोळ्यासमोर येत आहे. कालपासून झोप नाही आली मला...'

अण्णांच्या या स्पष्टीकरणाने हैदरहुसेनची उग्र मुद्रा एकदम सौम्य झाली. ज्या डोळ्यात सदा मग्रूरीची गिधाडे फडफडत तिथे नाजूक पालवी हिंदकळल्यासारखी ऋजुता आली. पापण्यांच्या बाहेर पडून दुनियेस खावयास निघालेली बुबुळे आत पाहू लागली. मान खाली टाकून तो अत्यंत मृदु आवाजात अण्णांना म्हणाला, ' महाराज हे माथं म्हणूनच तुमच्यापुढे नमतं. नाहीतर आमचं पहा. आमची अवलाद सारे लोक पुढं बोलत नाहीत. पण म्हणतात, ' पोलीसपाटलाची अवलाद अशीच असणार.' आम्हाला पोरांबद्दल असं प्रेम नाही व पोरांना आमच्याबद्दल आदर नाही. घरात एक सोडून त्यांना तीन आया आहेत. परंतु एकही आई नाही....'

क्षणभर स्तब्धता होती. पण ती बोचक नव्हती. असह्य नव्हती. अण्णांनी मला मांडीवर घेतले होते व त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने ते माझ्या जावळातून बोटे फिरवत होते. वातावरणातला व मनातला ताप सैल झाला होता. थोड्या वेळाने काही समजून घ्यावे अशा वृत्तीने अण्णांच्याजवळ सरकत हैदरहुसेननं विचारलं, ' महाराज एक सांगा. इंग्रजांना घालवून काय फरक पडणार ? आजादी मिळणार म्हणजे खरं काय होणार ? आज आपल्याला आजादी आहेच की. '

' हैदर कुठे आहे आजादी ? आपल्या देशाचा कारभार आज इंग्रज स्वत:चा फायदा करून घेण्यासाठीच सर्वस्वी चालवत आहेत. इंग्रज गेले की, आपल्याला त्यांच्याकडे जाणारा नफा मिळेल व आपल्या लोकांचे चांगले भले होईल.'

' म्हणजे महाराज या देशात काँग्रेसचे राज्य आल्यावर बरतानियात जशी सोन्याची नाणी आहेत तशी आपल्याकडे येणार....' यावर अण्णा नुसते हसले !

[ क्रमशः ]


# एका पराभवाची कहाणी

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी । अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये । राजहंस प्रकाशन

## मुक्काम मुंबई

पृष्ठ ८ वरून

क्षितीजावर लुकलुकत होता. व्यक्तिमहत्व यथातथाच. अर्धवट मराठी, हिंदी बोलणारा हा २२–२५ वर्षांचा चष्मेवाला तरुण अॅड. दादा नाईक, बाळ दंडवते, बाबूराव सामंत, कै. केशवराव गोरे, बाबू मुंबरकर या तरुणांच्या घोळक्यातून ट्रॅमच्या ४ पैश्याच्या तिकीटावर लहान लहान कामगार गटांतून फिरू लागला. पण लक्ष ठेवले पाटलांच्या म्युनिसिपालिटितील कामगारांवर. संयुक्त महाराष्ट्राच्या रणांगणावर पाटलांना तात्पुरता पराभव पत्करावा लागला आणि ५६ साली कॉर्पोरेशन समितीच्या हातात गेली. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हे तरुण टोळके हिरीरीने भाग घेत असे. पण सत्तेच्या आणि निवडणुकांच्या राजकारणात समितीपासून ही तरुण मंडळी वेगळी होती. ५४ साली लोहियांनी स्वतंत्र चूल थाटल्यानंतर मधू लिमये, जगन्नाथ जाधव, केशव गोरे, बाबूराव सामंत ही ध्येयवादी मंडळी येथे लोहिया पक्षाची जमावट करीत होती. पण अगदी चोरपावलांनी हे काम सुरू होते. समितीचे अचार्य दोंदे मेयर असताना आणि मुंबई शहरात समितीचे पाणीही पेटत असता धो धो पावसाळ्यात या तरुणांनी मुंबई म्युनिसिपल कामगारांचा संप पुकारला. हा हा म्हणता मुंबईच्या साऱ्या नाड्या आवळल्या गेल्या. एस्. एम्. जोशी, एस्. ए. डांगे, आचार्य दोंदे सर्वांपुढेच मोठा पेच निर्माण झाला. स्वतःला कामगार पुढारी म्हणविणारे हे नेते संप चिरडण्याची भाषा कशी मुखावाटे बाहेर काढतील ? त्यांना म्यु. कामगारांशी बोलणे भाग पडले. कामगारांचा तेव्हा नेता होता – आजचा बंदचा सम्राट जॉर्ज, पेच टाकून मोठ्या शक्तीला नामोहरम करण्याचा त्याचा तो पहिला प्रसंग होता.

हा हा म्हणता जॉर्ज वादळासारखा मुंबईच्या लहानसहान कानाकोपऱ्यातील कामगारांपर्यंत पोचला. आणि केव्हातरी जॉर्ज एक दिवस मोका साधून गर्जला.

'मुंबई चालवितो कोण ?'

'कामगार'

लाखोंच्या मुखांतून एकाच वेळी शब्द बाहेर पडले.

'मग २५ जूनला मुंबई बंद करूया?'

'हो, हो, हो.'

१४–१५ वर्षांपूर्वी त्यावेळी चव्हाणांच्या सरकारविरुद्ध जॉर्जने पहिली मुंबई बंद केली. त्या वेळपासून हा बंदचा सम्राट कितीही शक्तिक्षय झालेला दिसला तरी डांगे–पाटलांना मागे खेचून मोक्याची वेळ येताच यशस्वीपणे 'बंद' वर स्वार होतो. 'बंद'चा जन्मदाता अशा तऱ्हेने जॉर्ज फर्नांडिस आहेत. त्यापूर्वी 'बंद' शब्दप्रयोग कुणी वापरात आणला नव्हता.

२५ मे च्या 'बंद'च्या तयारीपूर्व काळात जॉर्जनी जे अनेक डावपेच उपयोगात आणले त्यातला एक महत्वाचा आणि २५ चा बंद पार पडल्यावरही

चादळी विषय बनलेला पेच म्हणजे महाराष्ट्रात जॉर्ज पोलिसांचे युनियन काढणार आहेत हा होय. --

वरवर अगदी अशक्य वाटणारी अशी ही पोलीस युनियनची घोषणा आहे. पण गेल्या २३ वर्षात जॉर्जचा ज्यांनी जवळून अभ्यास केला आहे त्यांना मात्र यांत अशक्य असे काही वाटत नाही कारण जॉर्जचे आतापर्यंतचे आयुष्यच असे गेले आहे, की मी मी म्हणणाऱ्यांना जे अशक्य वाटत होते ते जॉर्जनी शक्य करून दाखविले आहे.

१९६७ साली जॉर्ज दक्षिण मुंबईतून स. का. पाटलांविरूद्ध उभे होते, तेव्हा खुद्द त्यांच्या पक्षातील खंद्या नेत्यांनीही त्यांना मूर्खात काढले होते. पण त्यावेळी अशक्यप्राय वाटणारी घटना जॉर्जनी घडविली आणि आयुष्यात ज्यांना पराभव म्हणजे काय ते माहीत नव्हते त्या स. का. पाटलांची पाठ भूईवर लोळविली. --आणि वर सर्वोच्च न्यायालयाचा शिक्का मारून टाकला.

आता जॉर्ज महाराष्ट्रात पोलिसांचे युनियन काढणार आहे. जॉर्जचा हा स्टंट आहे म्हणून काही टीकाकार टाहो फोडीत आहेत. पण महाराष्ट्राच्या पोलिसांची हलाखी, समाजाकडून होणारी अवहेलना, आणि पुढाऱ्याकडे पत्करावी लागणारी लाचारी पाहाता जॉर्जला त्यात अशक्य असे काहीच वाटत नाही.

सर्वत्र बेकारी आणि वैफल्य असतानाही सुशिक्षत आणि सुसंस्कृत तरुण पोलिसात नोकरी पत्करावयास तयार नसतो. का? सरकारकडून, समाजाकडून अवहेलित झालेला माणूस पोलिसांशिवाय दुसरा कोणी सापडणार नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात लष्कराबद्दल आणि पोलिसांबद्दल समाजात तिटकारा दिसत असे, स्वातंत्र्योत्तर काळात लष्कराबद्दल पूर्वीपासून आलेला तिटकारा कायम आहे. महाराष्ट्राच्या दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर काळात येथे काँग्रेसच सत्तेवर राहिली. त्यामुळे 'काँग्रेसवाला' एवढ्या पदवीवर जगणारा स्मगलर, चोरटा व्यापारी, कुंटणखाना चालविणारा, हातभट्टीवाला या साऱ्यांपुढे पोलिसांना नमून वागावे लागते ही वस्तुस्थिती कोण नाकारील? 'गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडूनही ते काँग्रेसवाल्याने केले असेल तर सभापती फोन करून पोलीस स्टेशनला सांगतो 'थांबा कागद रंगवू नका, मी येतो' सभापती आल्यावर फौजदाराला सांगतो सदर 'गुन्हेगार' भाऊसाहेबांचा, बाळासाहेबांचा नाहीतर अमक्या तमक्या रावजीचा माणूस आहे त्याला गुन्हेगार करू नका, पोलीस स्टेशनला तसे वागावे लागते. साऱ्या महाराष्ट्रांत ही दुर्दशा आहे.

पोलीस मॅन्यूअलमध्ये पोलिसांचे आदर्श जे दाखविले आहेत ते खालील प्रमाणे--

1 : Politeness.
2 : Obediency.
3 : Loyalty.
4 : Integrty.
5 : Courage.
6 : Efficiecncy.

या आदर्शाप्रमाणे जीवन जगणारा पोलीस उभ्या महाराष्ट्रात एकतरी शोधून आज सापडेल का? असे जीवन जगण्यासाठी त्याचेवर जसे बाह्य दडपण असता उपयोगी नाही तसे त्याचे राहणीमान गरजा भागतील येथवरचे असावयास पाहिजे. महाराष्ट्राचा सामान्य पोलीस कसा जगतो याचे एक वानगी दाखल उदाहरण देतो.

महसूल मंत्र्यांच्या घराशेजारी विरार पोलीस स्टेशन आहे. जवळपास ३० पोलीस तिथे राहतात. त्यांच्या बायकांना रोज नित्य नियमाने रेल्वे लाईन बेकायदा क्रॉस करून रेल्वेचे **पाणी चोरून आणावे लागते.** पोलिसांच्या बायकांनाही सक्तीने चोरी करावी लागते.

वसई पोलीस लायनीतील संडासांना दरवाजे नाहीत. बायका गोणपाट काठीला उभा टेकवून विधी आटोपून घेतात. भिंतींना पुरातन भेगा असून त्यात साप, मणेर सर्रास संचार करीत असतात. वसईचा एक फौजदार आपल्या पत्नीशी एकांतात बोलत असता अवघ्या दीड फूटावर डोक्यावरच्या जुनाट छताच्या फटीतून डोके बाहेर काढून एक भला मोठा साप त्यांचे गुपित न्याहाळित होता. फौजदारपत्नीच्या हे लक्षात येताच ती जी माहेरी पळाली ती नवऱ्याची बदली झाल्यावरच त्याचेपाशी आली. ठाण्याच्या डी. एस. पी. च्या कचेरीत पावसा-पाण्यात जाताना माणूस घामाघूम होतो. त्या पेशवेकालीन इमारतीला आता स्वतःचा भार सांभाळणे कठीण झाले आहे, तिथे आणखी पोलीस ऑफिसचा जंजाळ ती म्हातारी इमारत कुठे संभाळणार?

महाराष्ट्रातील निम्म्या पोलिसांना रहावयाला जागा नाहीत. बाहेर खाजगी जागेत राहावयाचे तर सरकार पूर्ण भाडे देत नाही. हत्यारी पोलिसांचे हाल तर कुत्रा खाणार नाही. अंबरनाथला राहून पालघरला नोकरी करणारे जसे पोलीस आहेत तसे लोणावळ्याला नोकरी करून जुन्नरला राहणारेही पोलीस आहेत. मंत्री आणि सरकारी पाहुणे यांच्या बेताल आणि बेसूमार दौऱ्यांमुळे पोलिसांच्या ड्यूटीला वेळेची मर्यादा नाही. वाढत्या शहरीकरणामुळे आणि औद्योगिकरणामुळे पोलिसांच्या कामावर बेसुमार ताण पडत आहे आणि त्याची काहीच दखल शासन घेत नाही. अशी भुसभूशीत भूमी पायाला लागली असता जॉर्जसारखा माणूस पोलिसांची युनियन न बांधील तरच नवल. घटनेप्रमाणे पोलिसांची युनियन होऊच शकत नाही हा गेले १०।१५ दिवस चाललेला ओरडा बाष्कळपणाचा आहे. आपली घटना लवचिक आहे. सोयीनुसार तीत बदलही घडवून आणता येतो.

१९३० साली दिल्ली पोलिसांनी इंग्रजी सत्तेत संप केला होता तेव्हा पोलिसांना २० रुपये पगार होता. संपानंतर तो ३० झाला. १९४६ च्या पंत मंत्रीमंडळात भारताचे माजी पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री गृहमंत्री होते, तेव्हा पोलिसांनी संप केला होता. गृह-


डोळे झांकले
तरी चव
कांहीं
लपत
नाहीं !
SATHE
MALTeX
BISCUITS
ताजी, कुरकुरीत व
चवीला आगळीच –
वा ! ही तर
साठे माल्टएक्स
बिस्किटेच !
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता
माल्टमुळेंच या बिस्किटांत आहे.
पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्यें असलेली
माल्टएक्स बिस्किटें कितीही खा पुन्हा पुन्हा
खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!
साठे
बिस्किटे
आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा !
heros'-SBC 48C MAR

मंत्री शास्त्रींनी वाहतूक नियंत्रक हवालदाराचे कपडे चढवून लखनौच्या चौकात वाहतूक नियंत्रण केले, पण संप दडपून न टाकता त्यांच्या अडचणी विचारात घेतल्या.

बिहारचे माजी गृहमंत्री आणि अखिल भारतीय पोलीस संघटनेचे अध्यक्ष रामानंद तिवारी (समाजवादी) यांनी बिहारी पोलिसांचा संप यशस्वीरीत्या शेवटास नेला होता. आत्ताच उत्तर प्रदेशात ज्या सशस्त्र पोलिसांनी बंड केले त्या पोलिसांच्या (अराजपत्रित) संघटनेस मान्यता देण्यात येत आहे असे खुद्द त्या राज्याच्या आय. जी. पीं. नी १२ मे रोजी रेडिओवरून भाषण करून सांगितले. वस्तुतः शासनाचा अंतर्गत निर्णय आकाशवाणीवरून नसतो. तरीही उत्तर प्रदेशात तसे घडले आहे. या पार्श्वभूमीवर जॉर्ज फर्नांडिस पोलिसांच्या युनियनबद्दल नुसते बार उठवीत आहेत हे त्यांच्या विरोधकांचे अंदाज फोल आहेत. येत्या ६ महिन्यातच महाराष्ट्र पोलीस संघटनेचे कार्य सुरू झालेले दिसेल.

पोलीस हे 'कामगार' नाहीत म्हणून त्यांना युनियन बांधता येत नाही हा युक्तिवाद कालबाह्य आहे, 'कामगार' या शब्दाची व्याप्ती फार वाढलेली आहे, एकेकाळी कामगारांनाच कामगार युनियन स्थापनेस कायद्याने बंदी होती. पण तो काळ आता इतिहासजमा झाला आहे. मोठाल्या शहरांतील औद्योगिक कामगारांची आर्थिक आणि सामाजिक पत सामान्य पोलिसांपेक्षा निश्चितच वरच्या दर्जाची आहे, हे औद्योगिक कामगार समाजात मानाने जगत आहेत आणि पोलिसांना 'सखाराम' या नावाने संबोधितात. या 'सखाराम 'च्या मागे पोलिसाबद्दलची समाजाची अवहेलना दिसून येते. एकाच कुटुंबात एक भाऊ औद्योगिक कामगार, एक भाऊ एस्. टी. कामगार आणि तिसरा जर पोलिसात असला तर त्या तिसऱ्याला त्या कुटुंबातही तिसऱ्या दर्जाचा मान मिळतो. ही महाराष्ट्रातील पोलिसांची हलाखी कोण नाकारील ?

• • •


पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

स. न. वि. वि.

तुम्ही काही अंकात पारकर एजन्सी ची कोडे सोडवा व बक्षिसे मिळवा ही जाहिरात दिली होती. ही जाहिरात म्हणजे जनतेची शुद्ध फसवणूक आहे. ते सर्वांना तिसऱ्या नंबरचे बक्षिस मिळाले म्हणून कळवितात. त्यांच्याकडून ट्रॅन्झिस्टरसाठी ४७·७५ रुपये मागवितात व मग परत एक ट्रॅन्झिस्टरचे खोके १३५-०० रुपयाच्या व्ही. पी. ने पाठवितात व तुम्ही ३ ऱ्या नंबरचे बक्षिस मिळविले म्हणून ५० टक्के सवलतीत जपानी ट्रॅन्झिस्टर पाठविला आहे असे कळवितात. व अशातऱ्हेने ट्रॅन्झिस्टरच्या खोक्यासाठी १३५ + ४७·७५ = १८२·७५ रु. उकळतात!

माझी एक मैत्रिण ट्रॅन्झिस्टरचे खोके घेऊन फसली आहे. ह्यावेळी मी मुद्दामच कोडयाचे चुकीचे उत्तर पाठविले. माझी आकडयांची बेरीज ९० ऐवजी ७६ येत होती...तरीही त्यांनी मला तिसऱ्या नंबरचे बक्षिस मिळाले आहे म्हणून कळविले आहे !

इतरांनी फसू नये व तुम्ही जाहिरातीबद्दल जरा काळजीपूर्वक चौकशी करावी हा उद्देश.

—सौ. प्रफुल्लता तुपे, कोल्हापूर.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH-649

# माणूस

# चित्र

# वार्ता

# पुस्तक

# पुरवणी

# प्रसिद्धी

# जुलै

# १९७३